# प्रकरण दुसरे

## २.१ मजूर सहकारी संस्था म्हणजे काय ?

मजूर सहकारी संस्था हा औद्योगिक सहकारी संस्थेचाच एक प्रकार आहे. ज्याप्रमाणे औद्योगिक सहकारी संस्थेत वस्तूचे उत्पादन करून विक्री केली जाते. त्याप्रमाणे मजूर सहकारी संस्थेत श्रमिक सभासद श्रम करून वेतनाच्या मोबदल्यात श्रमाची विक्री करतात. मजूर सहकारी संस्थेच्या स्वरूपात मजूर सभासदांनी उत्पादन कार्य केले असता त्यांच्या श्रमशक्तीच्या मोबदल्यात वाढ होते.

मजूर सहकारी संस्था म्हणजे मनुष्यबळाचा वापर करून काम करणा-या कुशल, अकुशल, कारागिर, कष्टकरी मजूरांची सहकारी तत्वावर चालणारी एक संघटना होय यात मजूर सभासद हेच मालक असल्याने इतर व्यवसायातील मालक व कामगार असे स्वरूप मजूर सहकारी संस्थेत असत नाही.

सर्वसामान्यपणे विविध प्रकारच्या खात्याच्याकडून [एजन्सीजकडून] श्रमजीवी कामे मिळविण्याच्या उद्देशाने मजूर सहकारी संस्था स्थापन केल्या जातात. ज्या ठिकाणी मजूर सहकारी संस्था नसतात त्या ठिकाणी कामापासून मिळणारा नफा हा प्रत्यक्षात कंत्राटदार किंवा मध्यस्थाकडे जातो. परंतु ज्या ठिकाणी मजूर सहकारी संस्था असतात त्याठिकाणी तोच नफा अधिक वेतन किंवा रोजगारवाढी-साठी सहजासहजी वळविता येतो. मजूर सहकारी संस्था ही प्रामुख्याने ग्रामीण भागातील मजूरांचे सामाजिक - आर्थिक हित जपण्यासाठी आणि संवर्धन करण्या-साठी निर्माण केली जाते. कुशल आणि अकुशल कामगार मजूर सहकारी संस्था स्थापन करू शकतात. पण प्रत्यक्षात अकुशल कामगारांचे प्रमाण जास्त असते.

मजूर सहकारी संस्थेची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल. -

" मजूर सहकारी संस्था म्हणजे अशी स्वयंसेवी श्रम संघटना की जी सहकारी तत्वावर स्थापन झालेली असते. व ज्या संस्थेच्या सभासदांना सलग काम आणि किफायतशीर मजुरी मिळवून देण्याचा हेतू असतो आणि ज्याद्वारे मध्यस्थ आणि कंत्राटदार यांच्यामार्फत केल्या जाणा-या कामगारांच्या, पिळवणूकीचे उच्चाटन करून त्या कामगार सदस्याचे सामाजिक आर्थिक कल्याण आणि फायदा यांचे संवर्धन व्हावे. या हेतूने मजूरांनी स्वेच्छेने स्थापन केलेली सहकारी संस्था म्हणजे मजूर सहकारी संस्था होय " [२]

या ठिकाणी शासकीय पातळीवर केलेली मजूर सहकारी संस्थांची व्याख्या लक्षात घेता येईल. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० यामध्ये मजूर सहकारी संस्थेचा समावेश उत्पादक संस्थामध्ये करण्यात आला असून मजूर सहकारी संस्थेची व्याख्या पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

" उत्पादक संस्था या संज्ञेचा अर्थ मालाचे उत्पादन करणे व त्यांची विल्हेवाट लावणे किंवा आपल्या सदस्यांचे श्रम सामुदायिकपणे कामी लावणे हे ज्या संस्थेचे उद्दिष्ट आहे. ती संस्था असा होतो " [३]

सहकार नियोजन समीतीच्यामते " मजूर सहकारी संस्थेचे एक ठळक वैशिष्ट असे की त्यातील प्रत्येक मजूर आपल्या स्वातंत्र्याची खरी किंमत म्हणून जबाबदारीची जाणीव मनास बाळगतो व त्याचबरोबर काम हेच आपला मालक आहे असे मानतो " [४]

२.२ मजूर सहकारी संस्थेची आवश्यकता -

भारतीय लोकसंख्येपैकी आज सुध्दा ४५ टक्के लोक-संख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. यातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. यामध्ये

मुख्यत: अल्पभूधारक भूमीहीन शेतमजूर, अनुसुचित जाती, जमाती, मागासवर्गीय व आदिवाशी इत्यादींचा समावेश होतो. या लोकांच्या जवळ कोणत्याही प्रकारची संघटना नाही व परिणामी वाजवी वेतनावर सातत्यपूर्ण रोजगार मिळविण्यासाठी आवश्यक ती सौदाशक्ती नाही. महाराष्ट्रामध्ये भूमिहीन शेतमजूरांचे प्रमाण २४ % आहे व काही भागात तर अल्पभूधारक व भूमिहीन मजूर यांचे प्रमाण ५० टक्क्यापेक्षा अधिक पडते. अशा कमी अधिक मजूरीच्या उत्पन्नावर जगणा-या ग्रामीण लोकांच्या विकासासाठी मजूर सहकारी संस्थांची आवश्यकता आहे. [५]

दारिद्रयाचे निर्मूलन आणि समाजवादी समाजरचनेचे दिर्घकालीन उद्दिष्ट हे आपल्या नियोजनात गृहीत धरण्यात आले आहे. प्रामुख्याने समाजातील दुर्बल घटकांसाठी काही करण्याच्या उद्देशाने आणि दारिद्रयाचे निर्मुलन व समाजवादी समाजरचना ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहकारी संस्था या सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्राबरोबरच निर्माण झाल्या. यापेक्षाही सहकारी चळवळ ही ग्रामीण अर्थव्यवस्था प्रबळ करण्याच्या उद्देशाने निर्माण झाली. हे वास्तववादी चित्र आहे की या सहकारी चळवळीने ग्रामीण भागातील सर्व सामान्य लोकांची पत, व्यवसाय, प्रक्रिया, आणि उत्पादन क्षमता यांना चांगले स्वरुप दिले आहे. तथापि ग्रामीण भागातील खरा गरीब वर्ग अजून सुध्दा प्रभावीपणे सहकारी चळवळीच्या संपर्कात आलेला नाही आणि तशाप्रकारचे योग्य सहाय्य देखील त्यांना दिले जात नाही. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर सहकारी कामगार चळवळीचे काळजीपूर्वक मुल्यमापन करण्याची नितांत गरज वाटते. आधारभूतपणे बोलावयाचे झाले तर ग्रामीण आर्थिक स्थित्यंतर घडविण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागातील दुर्बल घटकांची आर्थिक पातळी उंचावण्यासाठी सहकारी चळवळ ही अतिशय परिणामकारकरित्या कार्य करु शकते. आपणास हेही लक्षात घ्यावयास हवे की योग्य प्रकारचे संघटन नसल्यामुळे आणि दिर्घकालीन अशा रोजगारहीन अवस्थेमुळे समाजातील दुर्बल घटक हा पिळवणुकीस बळी पडतआलेला आहे. रोजगारांच्या संधीच्या व संघटनांच्या अभावामुळे ग्रामीण [शहरी भागातील देखील] मजुरांची मध्यस्थ व इतरामार्फत फार मोठी पिळवणूक होते.

या पार्श्वभूमीवरच या दुर्बल घटकांला आर्थिकदृष्टया त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी किफायतशीर मजूरी व रोजगार संधी उपलब्ध करून देऊन मजूरांची मध्यस्थ व इतरांमार्फत होणा-या पिळवणूकीपासून सुटका करण्यासाठी, आर्थिक सुरक्षितता निर्माण करून देऊन त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढविण्यासाठी, मजुरांना आपल्या आर्थिक व सामाजीक हक्काची जाणीव करून देण्यासाठी आणि संघटनात्मक पायाचे महत्व पटवून देण्यासाठी मजूर सहकारी संस्था सर्वश्रेष्ठ साधन ठरू शकतील.[६]

मजूर सहकारी संस्थांची आवश्यकता आणखी एका कारणासाठी प्रतिपादन केली जाते ते असे की मजूर सहकारी संस्था निर्माण केल्याने, हळूहळू कंत्राटदार अगर ठेकेदार वर्ग यांचे प्राबल्य कमी होऊन त्यांची जागा मजूर सहकारी संस्था घेईल, व या मजूर सहकारी संस्थांना होणारा फायदा आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या सभासदांमध्ये वाटला जाईल व पर्यायाने त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होईल. तसेच शासनास सुध्दा पूर्वनियोजित अपेक्षित दरात कामे होऊन कामाच्या प्रतीतही सुधारणा होईल.[७]

मजूर वर्गामध्ये मागासलेल्या व शापित जाती जमातीतील लोक मोठया प्रमाणावर आहेत. त्यांना न्याय मिळून आपली परिस्थिती सुधारण्याकरीता त्याना अवशयक ती मदत तथा सहकार्य व उत्तेजन मिळाले पाहीजे या करिता त्यांच्या साठी खास संघटित झालेल्या मजूर सहकारी संस्थांची आवश्यकता आहे.

सामाजिक न्यायासह विकास हे आपल्या देशाच्या नियोजनाचे पायाभूत सुत्र आहे. नवीन वीस कलमी आर्थिक कार्यक्रमामध्ये समाजातील तळागाळातील लोकांच्या आर्थिक कल्याणाच्या कार्यक्रमावर भर देण्यात आलेला आहे. समाजातील मागासलेल्या दुर्बल घटकांचे कल्याण साधणे हा सहकाराचा मूलभूत हेतू आहे. शेतकरी, कामागार, भूमिहीन, आदिवासी, हरिजन, गिरीजन, दुर्बल घटक मजूर यांच्या गरजा भागविणे. त्यांची पिळवणूक थांबविणे व त्यांची आर्थिक उन्नत्ती करून जीवनमान उंचावणे या

बाबींना सहकारी कार्यक्रमामध्ये अग्रस्थान आहे. खासकरून मजूर सहकारी संस्थांचे कार्य यादृष्टीने महत्वपूर्ण आहे. मजूर सहकारी संस्थांमुळे मजुरांना रोजगाराची संधी मिळून त्यांची आर्थिक उन्नत्ती होऊन सामाजिक स्वास्थ्य निर्माण होण्यास मदत होते. यामुळेच मजूर सहकारी संस्थांची आवश्यकता प्रतिपादन केली जाते.

शहरामध्ये आणि ग्रामीण भागामध्ये फार मोठया प्रमाणावर बेकारी आहे, सुशिक्षित, अर्धशिक्षित, किंवा अशिक्षितांची बेकारी मोठया प्रमाणावर आहे. रोजगाराची संधी निर्माण करण्याच्यादृष्टीने नवनव्या उद्योगांधंद्याची स्थापना झाली पाहीजे. परंतु भांडवलदारी पध्दतीच्या उद्योगामुळे मजुरांचे प्रश्न सुटणार नाहीत. व त्यांचे शोषणही थांबणार नाही. सहकारी मार्गानेच या प्रश्नाची उकल होऊन मजूरांना न्याय मिळू शकेल. ग्रामीण भागात रोजगाराच्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे कामासाठी ग्रामीण भागातून फार मोठया प्रमाणावर लोकसंख्येचा लोंढा शहराकडे येत आहे. त्यामुळे शहरामध्ये अनेक समस्या निर्माण होत आहेत. विशेषत: लोकांच्या राहण्याच्या सोयी व नागरी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. झोपडपट्टया व बकालवस्ती निर्माण होते. म्हणून या लोकांना ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देऊन तेथेच गुंतविण्यासाठी स्थानिक साधनसंपत्ती व कच्चा मालाचा वापर करून मजुरांच्या सहकारी संस्था व ग्रामोद्योग व कुटिरोद्योगाच्या सहकारी संस्था संघटीत करण्याची आवश्यकता आहे. विशेषत: अशिक्षित मजूर वर्ग अद्यापही असंघटीत आहे. ठेकेदार व कंत्राटदारांच्याकडून त्यांचे मोठया प्रमाणात शोषण होते. त्यातून त्यांची सोडवणूक करून त्यांना संघटीत करण्याच्यादृष्टीने व त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला त्यांना मिळवून देऊन त्यांचे जीवन कांहीसे सुसाह्य होण्यासाठी मजूर सहकारी संस्था महत्वाच्या व आवश्यक आहेत.

यामुळेच मजूर सहकारी संस्थांचे महत्व अनन्य साधारण असे असल्याने मजूर सहकारी संस्थांची अवश्यकता आहे. [९]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

थोडक्यात भारतामध्ये मजुर सहकारी संस्थांची आवश्यकता निर्माण होण्याची कारणे खालील प्रमाणे सांगितली जातात :-

[१] सध्याच्या बांधकाम युगात प्रामुख्याने सार्वजनीक क्षेत्रात, या मजुरसहकारी संस्था मोठया प्रमाणात ग्रामीण भागातील बेकार व अर्धबेकारांना काम पुरवू शकतील.

[२] मजूर सहकारी संस्था कामगारांना पुरेसे वेतन देतील आणि खाजगी कंत्राट-दारांच्याकडून होणारी पिळवणूक थांबवतील.

[३] खाजगी कंत्राटदारांना राहणारे आधिक्य जर मजूर सहकारी संस्था स्थापन केल्यातर ते मजूरांना वेतन आणि बोनस इत्यादींच्या स्वरूपात मिळू शकेल.

[४] राष्ट्रीय बांधणीच्या कार्यक्रमात लोकांना सहभागी करुन किंवा भागीदार करून देशात समाजवादी समाज रचना प्रस्थापित करण्यासाठी लागणारे वातावरण मजूर सहकारी संस्था निर्माण करु शकतात.

[५] मजुर सहकारी संस्थांच्या मार्फत कामे पूर्ण करीत असताना असा एक महत्वाचा फायदा असतो की, त्या कामगारांना किंवा मजुरांना जे काम चालू आहे त्याविषयी जबाबदारीची जाणिव निर्माण होते.[१०]

## २.३ मजूर सहकारी संस्थेची उद्दिष्टे -

मजूर सहकारी संस्था या श्रम मजुरीची कामे घेणे व ती पार पाडणे यासाठी स्थापन केल्या जातात हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. मूलत: कोणत्याही सहकारी संस्थेची स्थापना स्वेच्छेने , स्वयंप्रेरणेने सामाजिक हितसंबंध असणा-या व्यक्तींच्याकडून केली जात असते. मजूर सहकारी संस्था याला अपवाद नाहीत. मजूर सहकारी संस्थांचा मध्यस्थाला म्हणजे ठेकेदाराला मिळणारा नफा मजूरांना उपलब्ध करुन देणे, रोजगाराच्या संधी मिळवून देणे, सभासद मजुरांचे सामाजीक-आर्थिक हित-संबंधाचे संवर्धन करणे ही प्रमुख उद्दीष्टे आहेत. या प्रमुख उद्दिष्टां खेरीज मजूर सहकारी संस्थांची पुढील काही उद्दिष्टे आहेत :-

[१] सरकारी, निमसरकारी, सहकारी क्षेत्रातील तसेच खाजगी क्षेत्रातील कामे यांची कंत्राटे मिळवून आपल्या सभासद मजुरांना योग्य आणि फायदेशीर रोजगार मिळवून देणे.

[२] प्राप्त कामांचे व प्राप्त होऊ शकणा-या कामांचे श्रम-प्रयत्नांच्यादृष्टीने असे नियोजन व संघटन करणे की ज्यामुळे सभासद मजूरांना वर्षभर सातत्यपूर्ण पूर्णवेळ रोजगार उपलब्ध होईल व त्यामुळे बेकारी, अर्धबेकारी टाळता येईल किंवा तिचे प्रमाण कमी करता येईल.

[३] हाती घेतलेल्या कामांची पूर्तता करण्यासाठी लागणारी आवश्यक ती हत्यारे, साधने व यंत्रे भाडयाने मिळविणे व क्रमश: ती संस्थेला विकत घेता येतील असा प्रयत्न करणे.

[४] सुतारकाम, बांधकाम, यंत्र संचलन हत्यारांचा वापर या किंवा यासारख्या महत्वाच्या कामासाठी आपल्या सदस्य कामगारांना त्याचे काम कुशलतेने पार पाडण्यासाठी किंवा मजूरांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ घडविण्यासाठी अवश्यक ते प्र-शिक्षण देण्यासाठी योग्य अशी पावले उचलणे.

[५] सभासद मजूराच्या खाजगी किंवा दैनंदिन कौटुंबिक उपभोगासाठी लागणा-या महत्वाच्या वस्तू एकत्र खरेदी करणे व त्या योग्य किंमतीना सभासदांना उपलब्ध करून देणे.

[६] सभासद मजूरांमध्ये स्वावलंबन सहकार्य व बचत या सवयी व प्रवृत्तींचा विकास घडविणे.

[७] श्रमशक्तीचे संघटन करून सौदाशक्तीत वाढ करणे.

[८] कामे देणा-या यंत्रणांकडून होणारे आडथळे संघ शक्तीच्या जोरावर नाहीसे करणे.

[९] श्रमशक्तीत वाढ करून वेतनमान व सभासद मजूरांच्या एकूण राहणीमानात वाढ करणे.

[१०] शासनाकडून मिळणा-या विविध सवलतींचा फायदा घेऊन सभासदांच्या रोजगार पातळीत वाढ करणे.

[११] सभासदांना लागणा-या साधनसामग्रीचा पुरवठा करणे व खेळत्या भांडवलाची प्राप्ती करून देण्यात मदत करणे.

[१२] श्रमाची प्रतिष्ठा राखणे.

[१३] मजूर सहकारी संस्थांची ही सर्व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रासंगिक आणि परिस्थितीजन्य कृती हाती घेणे.[११]

मजूर सहकारी संस्थांच्या वरील उद्दिष्टांखेरीज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० यानुसार मजूर सहकारी संस्थांच्या उप-विधी मध्ये मजूर सहकारी संस्थांची उद्दिष्टे खालील प्रमाणे देण्यात आली आहेत.

१] भविष्य निधीची योजना करून सदस्यांमध्ये काटकसर व स्वावलंबन, सहकार यांचा प्रसार होण्यास उत्तेजन देणे.

२] संस्थेच्या व सदस्यांच्या गरजा भागविण्याकरीता भागाच्या रूपाने, ठेवीच्या रूपाने, कर्जाच्या रूपाने, देणगीच्या रूपाने, प्रवेश फीच्या रूपाने भांडवल जमविणे.

३] अंग मेहनतीने काम करणा-या मजूरांची मग ते कुशल कारागीर असोत किंवा साधे मजूर असोत, आर्थिक स्थिती सुधारणे व त्यांकरिता खाजगी किंवा सार्वजनिक कामाची निविदा देऊन किंवा अन्य रीतीने मक्ते मिळवून ती पुरी करणे व सदस्यांना उद्योगाविना रहावे लागणार नाही अशारीतीने कामाची जोडणी करणे.

४] संस्थेला स्वत:च्या व तिच्या सदस्यांच्या उपयोगासाठी लागणारा माल, हत्यारे व यंत्रसामग्री खरेदी करणे, तसेच संस्थेच्या कामाकरिता जागा, इमारती, गुदामे, वाहतूकीची व इतर साधने भाडयाने घेणे अगर उपनिबंधक यांचे आगाऊ मंजुरीने ती बांधणे, उभारणे अगर विकत घेणे.

५] सदस्यांना उद्योगाकरिता लागणारा माल व हत्यारे त्यांचे जोखमीवर व

व त्यांचे खर्चाने पुरविणे, अगर हत्यारे व यंत्रसामुग्री भाड्याने देणे.

६] सदस्यांच्या गरजा अजमावून घरगुती कामासाठी लागणा-या जिनसा खरेदी करून पुरविणे व त्यासाठविण्याची व्यवस्था करणे.

७] सरकारने सोपविलेल्या नियंत्रित माल वाटपाचे काम करणे.

८] समाज विघातक रुढींना आळा घालणे, आणि सदस्याची नैतिक, सामाजिक व आर्थिक उन्नत्ती घडवून आणणे.

९] मजुरांचे धंद्यातील नवीन सुधारणा विषयक ज्ञानाचा सदस्यांमध्ये प्रसार करणे व त्या सुधारणा अंमलात आणणे. [१२]

२.४ मजूर सहकारी संस्थांचा इतिहास आणि विकास -

याठिकाणी भारतातील, महाराष्ट्रातील आणि सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचा इतिहास व त्यांचा विकास लक्षात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२.४.१ भारतातील मजूर सहकारी संस्थांचाइतिहास आणि विकास -

भारतातील मजूर सहकारी संस्थांचा इतिहास जरी ८० वर्षापेक्षा जास्त असला तरी खरा अर्थाने भारतामध्ये मजूर सहकारी संस्थांचा विकास व प्रगती ही १९६० नंतरच झालेली दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतामध्ये मजूर सहकारी चळवळ फारशी विकसित झालेली नव्हती. काही प्रायोगिक स्वरुपाच्या मजूर सहकारी संस्थांचे संघटन करण्याचा प्रयत्न दोन तीन राज्यामधून झालेला होता. १९४९-५० मध्ये मद्रास राज्यात ४० मजूर सहकारी संस्था होत्या व त्यांनी २ लाखं ६८ हजार रुपयांचे काम मिळविले होते. तर याच वर्षात या मजूर सहकारी संस्थांनी २ लाख २९ हजार रुपयांचे काम पूर्ण केलेले होते. मुंबई राज्यात १९४९-५० ला २२ मजूर सहकारी संस्था होत्या व

त्यांची सभासद संख्या १९०३ इतकी होती. व त्यांचे भागभांडवल २९ हजार रुपये होते.[१३]

पंचवार्षिक योजनांच्यामध्ये मजूर सहकारी संस्थांच्या विकासावर अधिकाधिक भर देण्यात आला. तसेच अशा प्रकारच्या मजूर सहकारी संस्था निर्माण करण्याचे ध्येय " राज्याच्या व पंचायत राज्य संस्थांच्या वतीने त्या लोकांना रोजगार पुरविणे आणि विकास करणे याबाबतीत प्रमुख साधन म्हणून निर्माण होतील आणि एकवेळ त्या स्थिर झाल्या की त्यांची व्याप्ती व त्यांचे फायदे समाजातील विविध घटकांना शक्यतो मिळतील" हे असावे, यावरही भर देण्यात आला. मजूर सहकारी संस्थांचा विकास भारतामध्ये १९६० नंतर होत गेलेला दिसतो, भारतीय पातळीवर मजूर सहकारी संस्थांचा विकास कसा होत गेलेला आहे हे पुढील तक्ता क्रमांक २.१ वरून स्पष्ट होईल.

<u>तक्ता क्रमांक २.१</u>

भारतातील मजूर सहकारी संस्थांची प्रगती

| वर्ष | मजूर सहकारी संस्थांची संख्या | निष्क्रीय मजूर सहकारी संस्था | सभासद [लाखात] | भागभांडवल [रु. लाखात] | खेळते भांडवल [रु. लाख] | केलेल्या कामाचे मुल्य [रु. लाखात] |
|---|---|---|---|---|---|---|
| १९६०-६१ | २४९१ | उपलब्धनाही | १.८७ | ४०.८८ | २४६.३१ | ३२६.४९ |
| १९७०-७१ | ५१६० | उपलब्ध नाही | ३.२१ | १४२.३६ | ६९०.१९ | १५३८.०८ |
| १९७५-७६ | ७९५० | उपलब्ध नाही | ४.४७ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | ३१८६.८२ |
| १९७६-७७ | ७८३९ | २८७८ | ४.४९ | २९८ | २५८७.७० | ४३८५.५० |
| १९७७-७८ | ९०८५ | ३२८३ | ५.२७ | ३५६.२५ | ३११७.४२ | ५४४२.२३ |
| १९८०-८१ | ११५४३ | उपलब्ध नाही | ७.४४ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | ७५३८.०० |

.!.

आधार : भारतातील सहकारी चळवळीची सांख्यिकी माहिती-रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटीन्स.

वरील तक्ता क्रमांक २.१ मधील आकडेवारी वरून असे दिसून येते की, क्रमाने मजूर सहकारी संस्थाचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास झालेला आहे. १९६०-७० या कालावधीमध्ये मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत आणि त्यांच्या सभासद संख्येत वेगाने वाढ झालेली दिसून येते. परंतु पुढील दशकात मजूर सहकारी संस्थांची संख्या आणि त्यांची सभासद संख्या यांच्या वाढीचा वेग पूर्वापेक्षा मंदावलेला दिसतो. ज्या प्रमाणात मजूर सहकारी संस्थांची संख्या वाढली त्या प्रमाणात मजूर सहकारी संस्थांची सरासरी सभासद संख्या वाढली नाही. १९६०-६१ मध्ये मजूर सहकारी संस्थांनी केलेल्या कामाचे मूल्य ३२६.४९ लाख रुपये इतके होते. तर १९८०-८१ मध्ये मजूर सहकारी संस्थानी ७५३८ लाख रुपये मूल्याचे काम केलेले होते. १९६०-६१ ते १९८०-८१ या वर्षी केलेल्या कामाचे मूल्य लक्षात घेऊन त्यांची तुलना केली तर मजूर सहकारी संस्थांची गुणात्मक वाढ झालेली दिसून येते.

१९७८ च्या अखेरीस, पंजाब, हरियाणा, दिल्ली, आंध्रप्रदेश, राजस्थान आणि उत्तरप्रदेश या राज्यात राज्यपातळीवर मजूर सहकारी संस्थांचे संघ होते. याशिवाय १२ राज्यांत ६२ ठिकाणी जिल्हा पातळीवरील मजूर सहकारी संस्थांचे संघ होते, हे संघ ज्या त्या ठिकाणी पुरेसे काम मिळविणे आणि त्यांचे प्रत्यक्ष प्रशासन करणे. याबाबतीत समन्वय साधतात. मजूर सहकारी संस्थांच्या मध्ये समन्वय साधणे आणि त्यांच्यामध्ये सुसूत्रता आपणे यासाठी राष्ट्रीय पातळीवर या मजूर सहकारी संस्थांचा एक राष्ट्रीय महासंघ स्थापन केलेला आहे.

१९८२-८३ मध्ये जंगल कामगार सहकारी संस्था आणि मजूर सहकारी संस्थांची एकूण संख्या १७,३२३ व त्यांची सभासद संख्या १०.०७ लक्ष होती तर १९८४-८५ मध्ये या संस्थाची संख्या १८,६७० व त्यांची सभासद संख्या ११.८६ लक्ष होती व त्यांनी

या वर्षी केलेल्या कामाचे मूल्य २४८.३७ कोटी रुपये इतके होते.[१४]

राज्यानुसार मजूर सहकारी संस्था -

भारतातील मजूर सहकारी संस्थांची प्रगती लक्षात घेत असताना भारतातील विविध राज्यांत मजूर सहकारी संस्थांची संख्या, त्यांचे सभासद व त्यांनी केलेल्या कामाची किंमत किती आहे याचा विचार खालील पत्रक क्र. २.२ मध्ये केलेला आहे. या पत्रकामध्ये मजूर सहकारी संस्थांच्यात कंत्राट व बांधकाम सहकारी संस्था आणि जंगल कामगार सहकारी संस्था यांचा समावेश केलेला आहे. या मध्ये पत्रक क्रमांक २.२ मध्ये १९७७-७८ च्या मजूर सहकारी संस्था, त्यांची सभासद संख्या व त्यांनी केलेल्या कामाचे मूल्य दर्शविले आहे.

पत्रक क्रमांक २.२

भारतातील राज्यानुसार मजूर सहकारी संस्था १९७७-७८

| राज्य | संस्थांची संख्या | संस्थांची सभासद संख्या | संस्थांनी केलेल्या कामाची किंमत [रुपये लाखात] |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| आंध्र प्रदेश | ८१७ [४१५] | ५५,९०४ | ५०.७४ |
| आसाम | २३ [११] | ६२१ | ९.९० |
| बिहार | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही. |
| गुजरात | ७४३ [२५९] | ५०,८९४ | ६४१.६५ |
| हरीयाणा | ४८४ [१००] | ३४,५९४ | ३६६.३७ |
| हिमाचल प्रदेश | १८ [१४] | १,३६१ | १.७२ |
| जम्मू-काश्मीर | ६ [५] | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |
| कर्नाटक | १९३ [१०९] | १७,८८१ | ११९.३३ |
| केरळ | ७७ [२६] | ११,२५८ | ४६.५९ |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| मध्यप्रदेश | ११४ [१११] | १२,८०१ | १५२.०७ |
| महाराष्ट्र | ३३९४ [३५५] | १,२८,४५४ | २१७.९८ |
| मणीपूर | ३७८ [१३४] | १४,५०४ | १०९.७५ |
| मेघालय | ८ | २०८ | ०.१३ |
| नागालँड | १ | १०४ | १.६० |
| ओरिसा | २०७ [१०३] | २६,३६८ | ४७.६७ |
| पंजाब | ७६४[१८४] | ५५,०७५ | ६९१.७३ |
| राजस्थान | ९०२[७६५] | २९,३३८ | १४८.०२ |
| तामीळनाडू | ११०[३३] | २१,९१३ | २२१.७१ |
| त्रिपुरा | ६[५] | २२५ | ०.०६ |
| उत्तरप्रदेश | ४१७[४१] | १७,५८८ | ४५.५३ |
| वेस्ट बंगाल | ११०७[३९०] | ३९,०३५ | ६००.०० |
| संपूर्ण भारत | ९०८५ | ५,१५,८९१ | ५४४२.२३ |

आधार : भारतातील मजूर सहकारी संस्थांची सांख्यिकी माहिती - रिझर्व्ह बॅन्क ऑफ इंडिया . १९७७-७८

पत्रक क्रमांक २.२. मध्ये कंसामध्ये दर्शविलेले आकडे निष्क्रीय मजूर सहकारी संस्थांचे दर्शविले आहेत. भारतातील एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी ३२२४ निष्क्रीय सहकारी संस्था आहेत. क्रियाशील मजूर सहकारी संस्थांपैकी १७४८ मजूर सहकारी संस्था शहरामध्ये आहेत. तर ३११६ मजूर सहकारी संस्था ग्रामीण भागामध्ये आहेत व राहिलेल्या मजूर सहकारी संस्था या संमिश्र स्वरूपाच्या आहेत.

मजूर सहकारी संस्थांची संख्या व त्यांची सभासद संख्या लक्षात घेता भारतातील एकूण राज्यांत महाराष्ट्र राज्य अग्रेसर दिसते.

मजूर सहकारी संस्थांनी केलेल्या कामाचे मूल्य लक्षात घेतल्यास गुजराथ, हरियाना, पंजाब आणि पश्चिम बंगाल ही राज्ये इतर राज्यापेक्षा सरस आहेत. तर निष्क्रीय मजूर सहकारी संस्थांची संख्या लक्षात घेतल्यास महाराष्ट्रात एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी निष्क्रीय मजूर सहकारी संस्थांची संख्या कमी आहे.

२.४.२. महाराष्ट्रातील मजूर सहकारी संस्थांची रचना इतिहास प्रगती -

महाराष्ट्रातील मजूर सहकारी संस्थांची रचना -

महाराष्ट्रातील मजूर सहकारी संस्थांची रचना ही पुढील प्रमाणे त्रिस्तरीय आहे.

अ] प्राथमिक मजूर सहकारी संस्था.

ब] जिल्हा मजूर सहकारी फेडरेशन.

क] राज्य मजूर सहकारी फेडरेशन

अ] प्राथमिक मजूर सहकारी संस्था -

या प्राथमिक मजूर सहकारी संस्था मजूर सभासदांमार्फत स्थापन केल्या जातात. या प्राथमिक मजूर सहकारी संस्था सभासदांमार्फत प्रत्यक्ष कामे करतात. सदर प्राथमिक मजूर सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र सर्वसाधारणपणे त्या त्या तालुक्या पुरते मर्यादित असते. कामाचे उपलब्धते प्रमाणे जिल्ह्यात व इतर ठिकाणी त्या काम करु शकतात. जर प्राथमिक मजूर सहकारी संस्थेस दुसऱ्या जिल्ह्यात काम करावयाचे असेल तर त्या जिल्ह्यातील जिल्हा फेडरेशनची व जिल्हा उपनिबंधक तसेच सदर जिल्ह्यातील जिल्हा फेडरेशनची व जिल्हा उपनिबंधक यांची परवानगी लागते. प्राथमिक मजूर सहकारी संस्थानी त्याना मिळणाऱ्या कामाच्या

प्राथमिक मजूर सहकारी संस्थेच्या सर्वसाधारण सभेला किंमतीच्या १ टक्का वर्गणी जिल्हा फेडरेशनला द्यावयाची असते. / प्राथमिक मजूर सहकारी संस्थेचे धोरण, कार्ये, अंदाजपत्रक, हिशोब इत्यादी ठरविण्याचे अधिकार असतात.

ब] जिल्हा मजूर सहकारी फेडरेशन -

प्राथमिक मजूर सहकारी संस्था या जिल्हा मजूर सहकारी फेडरेशनला संलग्न असतात म्हणजेच प्राथमिक मजूर सहकारी संस्था या जिल्हा मजूर सहकारी फेडरेशनचे सभासद असतात. परंतु हे सभासदत्व बंधनकारक नसते. मात्र ज्या प्राथमिक मजूर सहकारी संस्था सदस्य आहेत किंवा संलग्न आहेत अशा फक्त संलग्न प्राथमिक मजूर सहकारी संस्थांनाच जिल्हा फेडरेशनला मिळणारी कामे वाटण्याची असतात. व ती कामे व्यवस्थित होतात किंवा नाही हे पहावयाचे असते. तसेच जिल्हा फेडरेशनला काम देणारी खाती व प्राथमिक मजूर सहकारी संस्था यामध्ये समन्वय साधण्याचे कार्य करावे लागते. शासनाने जिल्हा स्तरावर दिनांक १३. ६. १९७९ रोजी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमली . सदर उपसमितीचे सभासद चिटणीस जिल्हा उपनिबंधक आहेत. सदर उपसमितीमध्ये मजूर सहकारी संस्थांना येणाऱ्या अडीअडचणींचा ऊहापोह करून मार्ग काढण्याचा आहे. प्राथमिक मजूर सहकारी संस्थांच्याकडून मिळणाऱ्या १ टक्का रक्कमेतून १० वा हिस्सा जिल्हा मजूर सहकारी फेडरेशनने राज्य मजूर सहकारी फेडरेशनला देणेचा आहे. प्राथमिक मजूर सहकारी संस्थेला आर्थिक, तांत्रिक व कायदेविषयक सहाय्य करण्याचे काम जिल्हा मजूर सहकारी फेडरेशनला करावे लागते.

क] राज्य मजूर सहकारी फेडरेशन -

सर्वात वरच्या स्तरावरील संस्था म्हणजे राज्यपातळीवरील राज्य मजूर सहकारी फेडरेशन होय. हे फेडरेशन राज्यातील सर्व जिल्हा मजूर सहकारी फेडरेशनची शिखर संस्था आहे. महाराष्ट्रात या फेडरेशनची स्थापना दिनांक

१९.३.१९७४ रोजी झाली. या फेडरेशनचे कार्यालय सध्या पुणे येथे आहे. जिल्हा मजूर सहकारी फेडरेशन, या राज्य मजूर सहकारी फेडरेशनचे सभासद असतात, राज्य मजूर सहकारी फेडरेशनला प्रामुख्याने पुढील कार्ये करावी लागतात :

१] शासन, जिल्हा मजूर सहकारी फेडरेशन व कामे देणारी खाती यामध्ये समन्वय साधणे.

२] जिल्हा मजूर सहकारी फेडरेशनच्या कार्यावर देखरेख ठेवणे व त्यांना मार्गदर्शन करणे.[१५]

महाराष्ट्रातील मजूर सहकारी संस्थांचा इतिहास आणि प्रगती -

महाराष्ट्र राज्यात मजूर, शेतमजूर व जंगल कामगार यांची संख्या जवळ जवळ दोन कोटींच्या आसपास आहे. हा सर्व मजूर वर्ग अशिक्षित, असंघटित, अकुशल असा आहे. त्यांच्या या असहाय्यतेचा फायदा खाजगी कंत्राटदार व जंगल ठेकेदार गेली कित्येक वर्षे फार मोठया प्रमाणावर घेत आहेत. या मजूर वर्गाची ठेकेदारांच्या पिळवणूकीतून मुक्तता व्हावी. श्रमाचे योग्य दाम सन्मानपूर्वक त्यांच्या पदरात पडावे, त्यांचे जीवनमान सुधारावे या हेतुने मजूर सहकारी संस्था महाराष्ट्रात स्थापन होण्यास सुरुवात झाली.

महाराष्ट्रातील मजूर सहकारी चळवळीची सुरुवात १९४८ पासून झालेली दिसून येते. जुन्या मुंबई प्रांतात खासबाग [बेळगांव] येथे "खासबाग मजूर सहकारी संस्था लि., खासबाग" या नावाची १९४८ साली मजूरांची पहिली सहकारी संस्था नोंदविण्यात आली. १९४८ व १९५० साली ठाणे जिल्हयात जंगल कामगार सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या.[१६]

मजूर सहकारी संस्थेला १९४८ साली पहिली सवलत देण्यात आली. त्या वेळी सरकारी ठरावात असे स्पष्ट म्हटलेले आहे की, शासनास टप्याटप्याने कंत्राटदार व ठेकेदार वर्ग कमी करुन त्यांची जागा मजूर सहकारी संस्थांना द्यावयाची आहे. असे केल्यामुळे कामामुळे होणारा फायदा मजूर सहकारी संस्थांचे सभासदांत

वाटला जाईल. व कालांतराने शासनासही योग्य खर्चात दर्जेदार कामे करून मिळतील. शासनाच्या या वरील धोरणामुळे व वेळोवेळी दिलेल्या सवलतीमुळे महाराष्ट्रात मजूर सहकारी संस्थांची प्रगती तक्ता क्रमांक २.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे झालेली दिसून येते.

तक्ता क्रमांक 2·3

महाराष्ट्रातील मजूर सहकारी संस्थांची

प्रगती दर्शविणारा तक्ता

| अ.नं. | तपशील | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संस्थांची संख्या | ३७१ | ११२५ | ३३३४ | ३९९४ | ४४०४ | ४४६८ | ४८९९ | ४८७९ | ४८१४ |
| २. | सभासद संख्या | १७४०० | ५१९०० | १७५२०० | २२६२०० | २४९६०० | २७७४०० | ३०४६०० | ३०११०० | २८४९०० |
| ३. | भागभांडवल (रु. लाखात) | ५ | ४८ | १४५ | १६४ | २२२ | २०९ | २३७ | २५६ | २५५ |
| ४. | स्वनिधी (रु. लाखात) | ८ | ६७ | १९३ | २२७ | २९७ | २८७ | ३२० | ३४३ | ३४५ |
| ५. | खेळते भांडवल (रु. लाखात) | ४५ | १४० | २१५४ | २६०८ | ३३३४ | ३८७२ | ४५४० | ५१९६ | ५२९४ |
| ६. | केलेल्या कामाची किंमत (रु. लाखात) | उपलब्धनाही | ४१२ | ३५७८ | ४४८६ | ६६५० | ७६४२ | ९१३४ | १२५५६ | १०४७१ |
| ७. | फायद्यातील मजूर सहकारी संस्था | १२१ | ४३९ | १५३९ | १९१० | २१९८ | २४९५ | २६७१ | २७३५ | २४३३ |
| ८. | तोटयातील मजूर सहकारी संस्था | १४० | उपलब्ध नाही | १२८५ | १३७२ | १६३७ | १६८० | १७६९ | १७०७ | १८७६ |

आधार - "महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ,एका दृष्टीक्षेपात" - १९८१ ते १९८८ ची सर्व पुस्तके.

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

तक्ता क्रमांक २.३ मध्ये १९६०-६१ ते १९८६-८७ पर्यंत महाराष्ट्रातील मजूर सहकारी संस्थांचा झालेला विकास दर्शविला आहे. या कालखंडातील आकडेवारी महाराष्ट्रातील मजूर सहकारी संस्थांची परिणामकारकरीत्या झालेल्या वाढीची प्रगती दर्शविते..

१९६०-६१ ते १९८०-८१ या काळात ९ पटीने मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत वाढ झालेली दिसते. १९६०-६१ साली मजूर सहकारी संस्थांची सरासरी सभासद संख्या ४६.९०होती तर १९८०-८१ मध्ये वाढ होऊन ती ५२.५५ झाली १९६०-६१ मध्ये मजूर सहकारी संस्थांच्याकडे असणारे सरासरी भागभांडवल रु.१३४८ होते ते १९८०-८१ मध्ये रु.४३४९ झाले. म्हणजे सरासरी भागभांडवलामध्ये ३.२२ पटीने वाढ झाली. तर एकूण भागभांडवलात २९ पटीने वाढ झाली. १९६०-६१ साली मजूर सहकारी संस्थांचा स्वनिधी सरासरी रु.२१५६ होता. त्यामध्ये वाढ होऊन १९८०-८१ मध्ये रु.५७८९ झाला. १९६०-६१ मध्ये खेळते भांडवल सरासरी रु.१२१२९ होते त्यामध्ये वाढ होऊन १९८०-८१ मध्ये ते रु.६४६०७ इतके झाले. ही झालेली सरासरी वाढ ५.३२ पट होती. १९८०-८१ साली प्रत्येक मजूर सहकारी संस्थेने केलेल्या कामाचे मुल्य सरासरी १,०७,३१९ रु. होते.

१९६०-६१ साली असणा-या एकूण मजूर सहकारी संस्थां पैकी ३२.६१ टक्के मजूर सहकारी संस्थां फायद्यात होत्या तर ३७.७४ टक्के मजूर सहकारी संस्था तोटयात होत्या. १९८०-८१ मध्ये एकूण मजूर सहकारी संस्थां पैकी ४६.१६ टक्के संस्थां फायद्यात होत्या तर ३८.५४ टक्के मजूर सहकारी संस्थां तोटयात होत्या. १९६०-६१ शी तुलना करता १९८०-८१ साली फायद्यातील मजूर सहकारी संस्थांचे प्रमाण वाढलेले दिसून येते. तर तोटयातील मजूर सहकारी संस्थांचे प्रमाण जवळ जवळ स्थिर राहिलेले दिसून येते.

अलीकडील काळातील महाराष्ट्रातील मजूर सहकारी संस्थांची प्रगती लक्षात घेता असे दिसून येते की, १९८१-८२ ते १९८६-८७ या काळात मजूर सहकारी संस्थांच्या

संख्येत १.२० पटीने वाढ झाली आहे. १९८१-८२ साली मजूर सहकारी संस्थांची सरासरी सभासद संख्या ५६.६३ होती. त्यामध्ये वाढ होऊन ती १९८६-८७ मध्ये ५९.१८ इतकी झाली. १९८१-८२ साली मजूर सहकारी संस्थांच्याकडे सरासरी भागभांडवल रू.४१०६ होते. ते १९८६-८७ मध्ये रू.५२९७ इतके झाले. ही झालेली वाढ १.२९ पट होती. तर एकूण भागभांडवलातील वाढ १.५५ पट होती. मजूर सहकारी संस्थांच्या स्वनिधी १९८१-८२ ला सरासरी रू.५६८४ होता. तो १९८६-८७ साली रू.७१६७ इतका झाला. खेळते भांडवल १९८१-८२ साली सरासरी रू.६५,२९८ इतके होते त्यामध्ये वाढ होऊन १९८६-८७ साली रू.१,०९,९७१ इतके झाले. १९८१-८२ साली मजूर सहकारी संस्थांनी केलेल्या कामाचे मूल्य सरासरी रू.१,१२,३१८ इतके होते. त्यामध्ये वाढ होऊन १९८६-८७ ला मजूर सहकारी संस्थांनी सरासरी रू.२,१७,५११/- किंमतीचे काम केले. याच काळात मजूर सहकारी संस्थानी केलेल्याकामाच्या एकूण मुल्यामध्ये २.३३ पटीने वाढ झाली.

१९८१-८२ साली असणा-या एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी ४७.८२ टक्के मजूर सहकारी संस्थां फायद्यात होत्या, तर ३४.३५ टक्के मजूर सहकारी संस्थां तोटयात होत्या. १९८६-८७ साली एकूण मजूर सहकारी संस्थां पैकी ५०.५४ टक्के मजूर सहकारी संस्थां फायद्यात तर ३८.९७ टक्के संस्थां तोटयात होत्या.

एकंदरीत १९६०-६१ ते १९८६-८७ या कालखंडाचा विचार करता महाराष्ट्रात मजूर सहकारी संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ झालेली दिसून येते.

महाराष्ट्रामध्ये मजूर सहकारी चळवळीचा जोमदार विकास झालेला आहे. यामध्ये प्रामुख्याने पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, सोलापूर आणि सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचा विकास अधिक झालेला आहे. अतिशय महत्वाचे म्हणजे महाराष्ट्रात राज्य पातळीवर राज्य मजूर सहकारी संघ निर्माण करण्याचे नेतृत्व सांगली जिल्हयाकडे जाते. यागोष्टीचा विचार करून सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचा विकास कसा होत गेलेला आहे हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

२.४.३ सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचा इतिहास व प्रगती -

महाराष्ट्रातील ज्या कांही मोजक्या जिल्हयामध्ये मजूर सहकारी संस्थांचा संख्यात्मक व गुणात्मक विकास प्रकर्षाने झालेला दिसतो त्यामध्ये सांगली जिल्हा अग्रभागी आहे सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांची चळवळ प्रामुख्याने सांगली जिल्हा मजूर सहकारी संस्थाचे फेडरेशनच्या स्थापनेनंतर प्रभावीपणे झालेली दिसून येते. ३० डिसेंबर, १९७० रोजी सांगली जिल्हा मजूर फेडरेशनची नोंदणी झाली. परंतु ख-या अर्थाने कामकाजाची सुरुवात १९७२ अखेर झाली असे म्हणता येईल.

सांगली जिल्हयात मजूर सहकारी संस्था प्रथम स्थापन करण्याचा मान शिराळा तालुक्याकडे जातो. सांगली जिल्हयातील शिराळा तालुक्यात १९५४ मध्ये पहिली मजूर सहकारी संस्था स्थापन करण्यात आली. त्यानंतर कमी अधिक प्रमाणात दुष्काळी भाग असणा-या सांगली जिल्हयातील तासगांव तालुक्यातील पलूस याठिकाणी १९५५ मध्ये मजूर सहकारी संस्था स्थापन झाली आणि त्यानंतर तिसरी मजूर सहकारी संस्था तुंग याठिकाणी स्थापन झाली. यानंतर कांही मजूर सहकारी संस्था सांगली जिल्हयातील कायम दुष्काळी भाग असणा-या जत, कवठे-महांकाळ, आणि आटपाडी तालुक्यात स्थापन झाल्या. १९५४ ते १९६६ या कालावधीत फक्त १६ मजूर सहकारी संस्था स्थापन झालेल्या होत्या. हया काळातील सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचा विकास अतिशय मंदगतीने झालेला होता. तरी देखील या काळात सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांची झालेली प्रगती अगदी समाधानकारक होती.

खालील पत्रक क्रमांक २.४ मध्ये सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांची प्रगती १९७१ पासून १९८८ पर्यंत कशी झाली हे दर्शविण्यात आलेले आहे.

## तक्ता क्रमांक २.४

## सांगली जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांची संख्यात्मक प्रगती

## १९७१-७२ ते १९८७-८८

| वर्ष | संस्थांची संख्या | संस्थांच्या संख्येतील बदल |
|---|---|---|
| १९७१-७२ | ४३ | - |
| १९७२-७३ | ५६ | १३ |
| १९७३-७४ | ९१ | ३५ |
| १९७४-७५ | १०२ | ११ |
| १९७५-७६ | १२१ | १९ |
| १९७६-७७ | १३० | ०९ |
| १९७७-७८ | १३९ | ०९ |
| १९७८-७९ | १४८ | ०९ |
| १९७९-८० | १६१ | १३ |
| १९८०-८१ | १७२ | ११ |
| १९८१-८२ | १७६ | ०४ |
| १९८२-८३ | १७६ | ०० |
| १९८३-८४ | १८१ | ०५ |
| १९८४-८५ | १८९ | ०८ |
| १९८५-८६ | १९१ | ०२ |
| १९८६-८७ | १८७ | - ०४ |
| १९८७-८८ | १८५ | - ०२ |

आधार : सांगली जिल्हा मजूर सहकारी संस्थांच्या फेडरेशनचे प्रत्येक वर्षाचे अहवाल -

नक्ता क्रमांक २.४ वरून असे स्पष्ट होते की १९७१-७२ ते १९७५-७६ या कालावधीत सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत वाढ होत गेलेली आहे. तर १९७६-७७ ते १९७८-७९ या कालावधीत सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांच्या वाढीचा वेग स्थिर राहिलेला आहे. १९७९-८० ते १९८५-८६ या काळात [१९८२-८३ हे वर्ष सोडून] सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत वाढ झालेली दिसते. परंतू ही वाढ १९७१-७२ ते १९७५-७६ या कालावधीतील मजूर सहकारी संस्थांच्या वाढीच्या तुलनेने कमी आहे. तथापि १९८६-८७ व १९८७-८८ या वर्षात मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत अनुक्रमे - ०४ आणि - ०२ ने घट झाली आहे.

सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांची तालुक्यानुसार विभागणी -

१९८२-८३ मधील सांगली जिल्हयातील विविध तालुक्यांतील मजूर सहकारी संस्थांची संख्या, त्यांची सभासद संख्या व सरासरी सभासद संख्या ही खालील नक्ताक्रमांक २.५ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्रमांक २.५

## सांगली जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांची तालुक्यानुसार विभागणी

१९८२-८३

| अ.नं. | तालुक्याचे नांव | मजूर सहकारी संस्थांची एकूण संख्या | एकूण सभासद संख्या | सरासरी सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | कवठे महांकाळ | १२ | ४७४ | ३९.५० |
| २. | मिरज | ३४ | १९६९ | ५७.९१ |
| ३. | जत | २३ | ८४७ | ३६.८३ |
| ४. | खानापूर | १६ | ६३१ | ३९.४४ |
| ५. | तासगांव | ३१ | ११४८ | ३७.०३ |
| ६. | शिराळा | २१ | ८१५ | ३८.८१ |
| ७. | वाळवा | २१ | ७५४ | ३५.९१ |
| ८. | आटपाडी | १८ | ६८९ | ३८.२८ |
| ९. | संपूर्ण सांगली जिल्हा | १७६ | ७३२७ | ४१.६३ |

आधार :- सांगली जिल्हा मजूर सहकारी संस्थांचे फेडरेशन, वार्षिक अहवाल १९८२-८३

सर्व सामान्यपणे अशी अपेक्षा असते की अधिक विकसित आणि शेती विकसित भागापेक्षा अधिक मागासलेल्या आणि दुष्काळी भागात मजूर सहकारी संस्थांची संख्या जास्त असते. परंतु मजूर सहकारी संस्थांच्या बाबतीत अशाप्रकारचे चित्र सांगली जिल्ह्यात असलेले दिसून येत नाही. मिरज तालुक्यात मोठया प्रमाणावर मजूर

सहकारी संस्थांची स्थापना झालेली दिसते. या मजूर सहकारी संस्था मिरज तालुक्यातील पूर्वेकडील छोटासा दुष्काळी भाग वगळता औद्योगिकदृष्टया व शेती दृष्टया आर्थिक विकासित झालेल्या भागामध्ये आर्थिक संस्थेने स्थापन झालेल्या आहेत.

दुस-या बाजूला, जत, कवठे महांकाळ, आणि आटपाडी तालुक्यात मजूर सहकारी संस्थांची संख्या आणि त्यांची सभासद संख्या कमी आहे. जत, कवठे महांकाळ आणि आटपाडी तालुके दुष्काळी असून त्याठिकाणी ब-याच प्रमाणात उघड स्वरूपाची आणि सुप्त किंवा छुपी बेकारी आढळून येते. त्यामुळे विकसित भागापेक्षा या दुष्काळी व मागासलेल्या भागामध्ये काम [रोजगार] उपलब्ध करून देण्यासाठी मजूर सहकारी संस्थांची गरज आहे.

वरील तक्त्यावरून मजूर सहकारी संस्थांची सर्वात जास्त सरासरी सभासद संख्या मिरज तालुक्यात आहे. तर सर्वात कमी सरासरी सभासद संख्या वाळवा तालुक्यात आहे हे स्पष्ट दिसते.

१९८२-८३ साली सांगली जिल्हयातील एकूण मजूर सहकारी संस्थांची संख्या १७६ इतकी होती व त्यांची सरासरी सभासद संख्या ४१.६३ होती असे दिसेल.

१९८७-८८ मधील सांगली जिल्हयातील विविध तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांची संख्या तक्ता क्रमांक २.६ मध्ये दर्शविलेली आहे.

तक्ता क्रमांक २.६

सांगली जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांची तालुक्यानुसार विभागणी

१९८७-८८

| अ.नं. | तालुक्याचे नांव | मजूर सहकारी संस्थांची संख्या |
|---|---|---|
| १. | कवठे महांकाळ | १६ |
| २. | मिरज | ३८ |
| ३. | जत | २२ |
| ४. | खानापूर | १५ |
| ५. | तासगांव | २९ |
| ६. | शिराळा | २१ |
| ७. | वाळवा | २३ |
| ८. | आटपाडी | २१ |
| ९. | संपूर्ण सांगली जिल्हा | १८५ |

आधार :- सांगली जिल्हा मजूर सहकारी संस्थांचे फेडरेशन वार्षिक अहवाल १९८७-८८

१९८२-८३ वर्षातील आकडेवारीशी [१७६] तुलना करता १९८७-८८ साली सांगली जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत [१८५] ९ ने वाढ झाली आहे. यामध्ये कवठे महांकाळ तालुक्यात ४, मिरज तालुक्यात ४, वाळवा तालुक्यात २ आणि आटपाडी तालुक्यात ३, अशा १३ नवीन मजूर सहकारी संस्था वाढल्या तर जत तालुक्यात १ खानापूर तालुक्यात १ आणि तासगांव तालुक्यात २, अशा ४ मजूर

सहकारी संस्था कमी झालेल्या आहेत. आणि शिराळा तालुक्यातील मजूर सहकारी संस्थांची संख्या स्थिर राहिलेली आहे.

## वर्गीकरण :-

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एल.सी.एस.१०७०/५५९३३/का.२७ दिनांक ३० मार्च १९७९ नुसार मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण अ, ब आणि क अशा तीन वर्गवारीमध्ये केले जाते. हे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात येते.

## अ वर्गातील मजूर सहकारी संस्था :-

१. ज्या मजूर सहकारी संस्थांजवळ स्वत:चे भांडवल कमीत कमी २५०० रुपये आहे.

२. ज्या मजूर सहकारी संस्थांना हिशोब तपासणीत अ अथवा ब वर्ग मिळाला आहे.

३. ज्या मजूर सहकारी संस्थेला कामाचा तीन वर्षांचा अनुभव आहे.

४. ज्या मजूर सहकारी संस्थांनी ठेकेदारीची कामे समाधानकारकरित्या पूर्ण केलेली आहेत. आणि

५. ज्या मजूर सहकारी संस्था जिल्हा संघात समाविष्ट आहेत.

अशा वरील सर्व मजूर सहकारी संस्थांचा अकुशल कामाकरिता अ वर्गात समावेश करण्यात येतो.

१. ज्या मजूर सहकारी संस्थेजवळ स्वत:चे भांडवल कमीत कमी १०,००० रुपये आहे.

२. ज्या मजूर सहकारी संस्थांना हिशोब तपासणीत अ अथवा ब वर्ग मिळाला आहे.

३. ज्या मजूर सहकारी संस्थांना कामाचा तीन वर्ष मुदतीचा अनुभव आहे.

४. ज्या मजूर सहकारी संस्थांनी ठेकेदारीची कामे समाधानकारकरित्या पूर्ण केलेली आहेत.

५. ज्या मजूर सहकारी संस्थेकडे कामकाजामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी कमीत कमी स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवीधारक अभियंता आहेत अथवा ज्या मजूर सहकारी संस्था तांत्रिक मार्गदर्शन देण्यास समर्थ असणा-या जिल्हा संघाच्या सभासद आहेत.

६. ज्या मजूर सहकारी संस्थांजवळ कामास लागणारी सर्व यंत्रे, अवजारे आहेत किंवा दुसरीकडून मिळण्याची क्षमता आहे.

अशा वरील सर्व मजूर सहकारी संस्थांचा कुशलकामाकरिता अ वर्गात समावेश करण्यात येतो.

ब वर्गातील मजूर सहकारी संस्था :-

१. ज्या मजूर सहकारी संस्थांजवळ स्वत:चे भांडवल १२५० रुपये आहे.

२. ज्या मजूर सहकारी संस्थांना हिशोब तपासणीत कमीत कमी क वर्ग मिळालेला आहे.

३. ज्या मजूर सहकारी संस्थांना कामाचा दोन वर्षाचा अनुभव आहे आणि

४. ज्या मजूर सहकारी संस्था जिल्हा संघाच्या सभासद आहेत.

अशा सर्व मजूर सहकारी संस्थांचा समावेश अकुशल कामाकरिता ब वर्गात करण्यात येतो.

१. ज्या मजूर सहकारी संस्थांजवळ स्वत:चे कमीत कमी भांडवल ५००० रुपये आहे.

२. ज्या मजूर सहकारी संस्थांना हिशोब तपासणीत ब अथवा क वर्ग मिळालेला आहे.

३. ज्या मजूर सहकारी संस्थांना कामाचा दोन वर्षाचा अनुभव आहे.

४. ज्या मजूर सहकारी संस्थांनी केलेली कामे समाधानकारकरित्या पूर्ण केलेले आहेत.

५. ज्या मजूर सहकारी संस्थांकडे कामकाजात मार्गदर्शन करण्यासाठी तांत्रिक व्यक्ती आहे अथवा ज्या मजूर सहकारी संस्था तांत्रिक मार्गदर्शन करण्यास समर्थ असलेल्या संघाच्या सभासद आहेत.

६. ज्या मजूर सहकारी संस्थांच्या जवळ बांधकामास आवश्यक साहित्य आहे अथवा दुसरी कडून मिळण्याची क्षमता आहे.

अशा वरील सर्व मजूर सहकारी संस्थांचा कुशल कामाकरीता ब वर्गात समावेश करण्यात येतो.

क वर्गातील मजूर सहकारी संस्था :-

१. ज्या मजूर सहकारी संस्थांजवळ स्वत:चे भांडवल कमीत कमी २५० ते ५०० रुपये आहे.

२. ज्या मजूर सहकारी संस्थांना हिशोब तपासणीत कमीत कमी क वर्ग मिळालेला आहे.

३. ज्या मजूर सहकारी संस्थांनी केलेली कामे समाधानकारकरित्या पूर्ण केलेली आहेत.

४. ज्या नवीन मजूर सहकारी संस्थांना हिशोब तपासणीत वर्गवारी मिळालेली नसल्यास त्या मजूर सहकारी संस्था आर्थिकदृष्टया परिपूर्ण आहेत. तसेच त्यांची व्यवस्थापकीय व्यवस्था समाधानकारक आहे.

५. ज्या मजूर सहकारी संस्था जिल्हा संघाच्या सभासद आहेत.

अशा वरील सर्व मजूर सहकारी संस्थांचा अकुशल कामाकरिता क वर्गात समावेश करण्यात येतो.

१. ज्या मजूर सहकारी संस्थांजवळ स्त:चे भांडवल कमीत कमी २००० रुपये आहे.

२. ज्या मजूर सहकारी संस्थांना हिशोब तपासणीत कमीत कमी क वर्ग मिळालेला आहे.

३. ज्या मजूर सहकारी संस्था नवीन आहेत व हिशोब तपासणीत त्यांना वर्गवारी मिळालेली नसल्यास या मजूर सहकारी संस्थांकडे समाधानकारक आर्थिक व व्यवस्थापकीय व्यवस्था असावी.

४. ज्या मजूर सहकारी संस्थांकडे काम करण्यासाठी तांत्रिक व व्यवस्थापकीय क्षमता आहे.

५. ज्या मजूर सहकारी संस्था तांत्रिक मार्गदर्शन करू शकणा-या जिल्हा संघाच्या सभासद आहेत.

अशा वरील सर्व मजूर सहकारी संस्थांचा कुशल कामाकरिता क वर्गात समावेश करण्यात येतो [१७]

अवर्गीकृत मजूर सहकारी संस्था :-

सांगली जिल्हा मजूर सहकारी संघातील अधिका-यांशी चर्चा करता असे समजले की ज्या मजूर सहकारी संस्थांनी जिल्हा संघाकडे आपल्या संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही, पुरेशी माहिती दिलेलीनाही. अशा सर्व मजूर सहकारी संस्थांचा समावेश अवर्गीकृत संस्थांच्यामध्ये केला जातो.

थोडक्यात मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण हे मजूर सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती, हिशोब तपासणीतील वर्ग, कामाचा अनुभव, कामगारांचे कौशल्य, साधन सामग्री, जिल्हा संघाचे सभासदत्व इत्यादी घटकांवर अवलंबून असते. मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण हे त्या भागातील मजूर सहकारी संस्थांच्या चळवळीची गुणात्मक स्थिती दर्शविते.

३० मार्च १९७९ च्या शासन निर्णयानुसार अ वर्गातील मजूर सहकारी संस्थांना १ लाख रुपयापर्यन्तच्या किंमतीची कामे दिली जातात. ब वर्गातील मजूर सहकारी संस्थांना ५०,००० रुपयापर्यन्तच्या किंमतीची कामे दिली जातात. आणि क वर्गातील मजूर सहकारी संस्थांना २०,००० रुपयापर्यन्तच्या किंमतीची कामे दिली जातात. अशी सर्व कामे मजूर सहकारी संस्थांना कामाच्या निविदा न मागविता कृषी व सहकारी विभागाने विहित केलेल्या पध्दतीनुसार देण्यात येतात. तर अवर्गीकृत मजूर सहकारी संस्थांचा समावेश सार्वजनिक बांधकाम विभागांच्या काम वाटपाच्या यादीत होत नाही.

ज्या भागात अ आणि ब वर्गातील मजूर सहकारी संस्था अधिक आहेत. त्या भागात मजूर सहकारी संस्था विकसित, स्थिर आणि गतीमान आहेत असे म्हणता येईल तर ज्या ठिकाणी क वर्गातील मजूर सहकारी संस्था अधिक आहेत. त्याठिकाणी मजूर सहकारी संस्थांची संखयात्मक वाढ झालेली आहे पण गुणात्मक वाढ झालेली नाही असे म्हणता येईल.

## सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण -

तक्ता क्रमांक २.७ मध्ये १९८१-८२ सालामधील सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरण दर्शविलेले आहे.

तक्ता क्रमांक २.७ वरून असे दिसून येते की १९८१-८२ मध्ये सांगली जिल्हयातील एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी ५३.४१ टक्के मजूर सहकारी संस्था अवर्गीकृत होत्या. अवर्गीकृत मजूर सहकारी संस्थांचे प्रमाण हे विविध तालुक्यात ८०.६५ टक्के [तासगांव तालुका] ते १६.६७ टक्के [कवठे महांकाळ तालुका] च्या दरम्यान होते. जत, आटपाडी, खानापूर, कवठे महांकाळ या मागासलेल्या भागात अवर्गीकृत मजूर सहकारी संस्थांचे प्रमाण तुलनात्मक दृष्टया कमी होते.

सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचे तक्ता क्रमांक २.७ मधील वर्गीकरण पहाता असे दिसते की एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी ६.२५ टक्के मजूर सहकारी संस्था अ वर्गात होत्या या अ वर्गातील मजूर सहकारी संस्थांचे प्रमाण विविध तालुक्यात १६.६७ टक्के [आटपाडी तालुका] ते २.९४ टक्के [मिरज तालुका] च्या दरम्याने होते. तासगांव व शिराळा या तालुक्यात यावर्षी एकही अ वर्गातील मजूर सहकारी संस्था नव्हती. तर एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी २१.०२ टक्के मजूर सहकारी संस्थां ब वर्गात होत्या. ब वर्गातील मजूर सहकारी संस्थांचे प्रमाणे विविध तालुक्यात ३७.५० टक्के [खानापूर तालुका] ते १२.९० टक्के [तासगांव तालुका] च्या दरम्यान होते. आणि एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी १९.३२ टक्के मजूर सहकारी संस्थां क वर्गात होत्या. क वर्गातील मजूर सहकारी संस्थांचे प्रमाणे विविध तालुक्यात ३८.८९ टक्के [आटपाडी तालुका] ते ६.२५ टक्के [खानापूर तालुका] च्या दरम्यान होते. याचा अर्थ या वर्षातील वर्गीकृत मजूर सहकारी संस्थांपैकी बहुसंख्य मजूर सहकारी संस्थां "ब" वर्गात होत्या. त्याच्या खालोखाल क वर्गात आणि शेवटी "अ" वर्गातील मजूर सहकारी संस्थां होत्या. अ वर्गातील मजूर सहकारी संस्थांच्या संख्येचे प्रमाण कमी असल्याचे कारण म्हणजे तांत्रिक मार्गदर्शन, कुशल मजूर आणि स्वत:च्या मालकीची साधने इत्यादींचा अभाव होता. यासाठी सरकारने पुढाकार घेऊन मजूर सहकारी संस्थांची गुणात्मक वाढ करणे आवश्यक आहे.

३० मार्च १९७९ च्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांना त्यांच्या वर्गीकरणानुसार कामाची निविदा न मागविता ज्या किंमतीची कामे दिली जात होती. त्यामध्ये ५ डिसेंबर १९८४ च्या शासन निर्णय क्रमांक एल.सी.एस. १०८३/८४७१४/ ७९८/ मि.व्य. ३ नुसार बदल करून कामाची निविदा न मागविता अ वर्गातील मजूर सहकारी संस्थांना २ लाख रुपया पर्यन्तची, ब वर्गातील मजूर सहकारी संस्थांना १ लाख रुपयापर्यन्तची आणि क वर्गातील मजूर सहकारी संस्थांना ५०,००० रुपया-पर्यन्तच्या किंमतीची कामे दिली जात आहेत. यानुसार सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांचे १९८७-८८ मधील वर्गीकरण तक्ता क्रमांक २.८ मध्ये दर्शविलेले आहे.

तक्ता क्रमांक २.८ मधील आकडेवारी वरुन असे दिसून येते की १९८७-८८ मधील सांगली जिल्ह्यातील एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी २६.६० टक्के मजूर सहकारी संस्थां अवर्गीकृत आहेत. तर वर्गीकृत मजूर सहकारी संस्थांपैकी अ वर्गातील मजूर सहकारी संस्थां ४१.४९ टक्के, ब वर्गातील मजूर सहकारी संस्थां २५.५३ टक्के आणि क वर्गातील मजूर सहकारी संस्थां ६.३८ टक्के आहेत. यांची १९८१-८२ मधील आकडेवारीशी तुलना करता असे दिसून येते की १९८७-८८ मध्ये अवर्गीकृत मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत जवळ जवळ निम्याने घट झालेली आहे. जत तालुक्यात अवर्गीकृत मजूर सहकारी संस्थां नाहीत. मागासलेल्या व दुष्काळी असणा-या कवठे महांकाळ तालुक्यात सर्वात कमी [ १८.७५ टक्के] अवर्गीकृत मजूर सहकारी संस्थां आहेत. १९८१-८२ शी तुलना करता १९८७-८८ मध्ये अ वर्गातील मजूर सहकारी संस्थांच्या संख्येत जवळ जवळ ७ पटीने वाढ झाली आहे ब वर्गातील मजूर सहकारी संस्थांमध्ये फारशी वाढ झालेली नाही आणि क वर्गातील मजूर सहकारी संस्थांची संख्या जवळ जवळ तीन पटीने कमी झालेली आहे.

## सांगली जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांची प्रगती व त्यांची वित्तीय स्थिती :-

१९७० साली सांगली जिल्ह्यात जेमतेम२७ मजूर सहकारी संस्थां नोंदविल्या होत्या. त्यातील जेमतेम निम्या मजूर सहकारी संस्थां प्रत्यक्ष कार्य करीत होत्या.

तक्ता क्रमांक २.९ मधील आकडेवारी लक्षात घेता असे दिसून येते की, मजूर सहकारी संस्थांची संख्या व त्यांची सभासद संख्या वाढत गेलेली आहे. १९७५-७६ मध्ये मजूर सहकारी संस्थांची संख्या १२१ होती. व त्यांची सरासरी सभासद संख्या ४३.२२ होती. त्यामध्ये वाढ होऊन १९८१-८२ मध्ये मजूर सहकारी संस्थांची संख्या १७६ व त्यांची सरासरी सभासद संख्या ५२.७८ झाली.

मजूर सहकारी संस्थांची वित्तीय स्थिती लक्षात घेता असे दिसते की १९७५-७६ मध्ये सभासद भागभांडवल २.५८ लक्ष रूपये होते. त्यात प्रत्येक सभासदांच्या भाग भांडवलाचा हिस्सा जवळ जवळ ५० रूपये इतका होता. एकूण सभासद भाग भांडवलात वाढ होत जाऊन ते १९८१-८२ मध्ये ३,१८,३०० रूपये झाले त्यात प्रत्येक सभासदांच्या भागभांडवलाचा हिस्सा जवळ जवळ ३४ रूपये होता. मजूर सहकारी संस्थांच्या सभासदांचे दारिद्र्य लक्षात घेऊन, सरकारने मजूर सहकारी संस्थांच्या भाग भांडवलात सहभागी होण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. १९७५-७६ मध्ये महाराष्ट्र शासनाने सांगली जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांचे ६५,००० रूपयांचे भाग भांडवल घेतले ते सभासद भागभांडवलाच्या २५ टक्के होते. तरी १९८१-८२ मध्ये महाराष्ट्र शासनाने सांगली जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांचे १,९०,४०० रूपयाचे भाग भांडवल घेतले ते सभासद भागभांडवलाच्या ६० टक्के होते. जर अशाप्रकारे सरकारचे भागभांडवलाचे प्रमाण वाढत गेले तर संपूर्ण मजूर सहकारी संस्थांच राज्याच्या मदतीवर अवलंबून राहतील आणि त्यामुळे मजूर सहकारी संस्थांची असणारी मूलभूत तत्वेच -हास पावतील.

१९७५-७६ मध्ये मजूर सहकारी संस्थांचा निधी ८५,००० रूपयाचा होता. त्यांचे मजूर सहकारी संस्थेशी असणारे सरासरी प्रमाण ७०२.४८ रूपये होते. १९८१-८२ साली त्यामध्ये वाढ होऊन तो १,४०,५५० रूपये झाला व त्याचे मजूर सहकारी संस्थेची असणारे सरासरी प्रमाणे ८०७.७६ रूपये झाले. यावरून हे स्पष्ट होते की राखीव निधीचा विचार करता मजूर सहकारी संस्थांची नफा मिळवतीची क्षमता तेवढीशी समाधानकारक नाही.

या ठिकाणी हेही लक्षात घेण्यासारखे आहे की आपल्या बॅन्का मजूर सहकारी संस्थांना आर्थिक सहकार्य करण्याच्या बाबतीत फारशा उत्साही नाहीत. १९७५-७६ साली सांगली जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांना त्यांनी फक्त ७५,००० रुपयाचे कर्ज दिले होते ते खेळत्या भांडवलाच्या २ टक्के आणि मिळालेल्या कामांच्या मूल्याच्या १ टक्के होते. १९८१-८२ साली या मजूर सहकारी संस्थांना मिळालेले कर्ज ६१,००० रुपयाचे होते ते खेळत्या भांडवलाच्या १ टक्के आणि मिळालेल्या कामाच्या मुल्याच्या १ टक्क्यापेक्षाही कमी आहे. ही आकडेवारी असे दर्शविते की संघटित बॅन्क विभागाकडून मजूर सहकारी संस्थांच्या कामांना अगदीच किरकोळ अर्थपुरवठा झाला आहे. तथापि सुदैवाची गोष्ट ही की मजूर सहकारी संस्थांचे खेळते भांडवल मिळालेल्या कामाच्या मुल्याच्या ४५.५७ टक्के आहे. ही स्थिती पुढील घटकावरून स्पष्ट करता येते -

[१] प्रत्येक कामांच्या बाबतीत काम उपलब्ध करून देणाऱ्या संस्था, कामांच्या किंमतीच्या २० टक्के आग्रीम मजूर सहकारी संस्थांना देतात.

[२] अतिशय महत्वाची गोष्ट म्हणजे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्क सर्वसाधारणपणे एकूण कामांच्या किंमतीच्या६५ टक्के रक्कम खेळते भांडवल म्हणून आग्रीम देते.

मजूर सहकारी संस्थांच्याकडून ट्रॅक्टर्स, रोलर्स, बुलडोझर्स आणि साधीसुधी कामाची साधने [अवजारे] इत्यादी तांत्रिक बाबीत गुंतवणूक केली जाते. १९७५-७६ मध्ये अशी ८०,००० रुपयांची गुंतवणूक केली गेली होती. त्यामध्ये वाढ होऊन १९८१-८२ मध्ये १,४०,००० रुपयांची गुंतवणूक झाली. अशा प्रकारची आणखी गुंतवणूक केली तर मजूर सहकारी संस्थांच्या वर्गीकरणात सुधारणा होईल. आणि त्याचबरोबर प्रत्येक मजूराच्या सरासरी भांडवलात वाढ होईल. तसेच त्यामुळे मजूरांच्या उत्पादकतेत, कार्यक्षमतेत वाढ होईल, परिणामता मजूरांच्या उत्पन्नात वाढ होईल.

सांगली जिल्हयात मजूर सहकारी संस्थांच्या फेडरेशनच्या स्थापनेनंतरच्या काळाचा विचार केल्यास असे दिसते की एकूण मजूरी सहकारी संस्थांपैकी फक्त ५ ते १० टक्के मजूर सहकारी संस्था प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या नाहीत. तसेच तोटयात चालणाऱ्या मजूर सहकारी संस्थांचे प्रमाण अतिशय अल्प आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे प्राथमिक मजूर सहकारी संस्थांना जिल्हा फेडरेशनकडून सर्व प्रकारचे सहकार्य उपलब्ध करून देण्यात येते. त्यामध्ये काम मिळवणे, त्याची छाननी करणे, कामाची जागा, यंत्रसामुग्री, कामाचे मोजमाप, बिले इत्यादी बाबींचा समावेश होतो. त्यामुळे प्राथमिक मजूर सहकारी संस्थांना मिळणाऱ्या कामात व मिळालेली कामे पूर्ण करण्यात या संस्थांनी बरीच प्रगती केली आहे. १९७५-७६ ते १९८१-८२ या कालावधीमध्ये मजूर सहकारी संस्थांना मिळालेल्या कामांचे मूल्य व त्यांनी पूर्ण केलेल्या कामांचे मूल्य यांचे प्रमाण या विविध वर्षात ते ६७ % ते ८० % च्या दरम्यान आहे तर याच कालावधीतील हेच सरासरी प्रमाणे ७३.३२ % आहे. तसेच मजूर सहकारी संस्थांना मिळालेल्या कामांची संख्या व पूर्ण केलेल्या कामांची संख्या यांचे याच कालखंडातील प्रमाण हे या विविध वर्षात ७४ % ते ९४ % च्या दरम्यान आहे. तर याच कालातील यांचे सरासरी प्रमाण ७९.५० % आहे. एकूण मजूर सहकारी संस्थांपैकी नफ्यातील मजूर सहकारी संस्थांचे प्रमाणे देखील समाधानकारक परिस्थिती दर्शविते. दिलेल्या मजुरीच्या आकडयांवरूनही सांगली जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांच्या चळवळीच्या प्रगतीची कल्पना येते. १९७५-७६ साली देण्यात आलेल्या मजुरीची रक्कम ५२ लाख रूपये इतकी होती. तर १९८१-८२ साली ती १ कोटी ५ लाख ८० हजार रूपये इतकी होती.

तक्ता क्रमांक २.९ वरून आणखी एक गोष्ट दिसून येते ती ही की मिळवलेली कामे, पूर्ण केलेली कामे, दिलेली मजुरी व इतर बाबतीत १९७७-७८ वर्षात तुलनात्मक दृष्टया भरीव प्रगती झालेली आहे. मात्र तोच वेग नंतरच्या दोन वर्षाच्या काळात टिकून राहू शकलेला नाही. कारण या दरम्यान त्यावेळच्या सहकार मंत्र्यांनी मजूर सहकारी संस्थांच्या नावाखाली कांही खाजगी कंत्राटदार

सहकारी संस्थांना मिळणा-या सोयी सवलती मिळवून आपला धंदा करतात असा आक्षेप केलेला होता. म्हणजेच मजूर सहकारी संस्थांमधील काही संस्था प्रत्यक्ष मजूरांच्या नसून खाजगी कंत्राटदारांच्या आहेत. असा आरोप होता. यासाठी त्यावेळच्या सहकार मंत्र्यानी या मजूर सहकारी संस्थांच्या छाननीचे धोरण अवलंबिले व काही सभासदांचे सभासदत्व रद्द करण्यात आले. या छाननी कार्यक्रमाचा असा परिणाम झालेला दिसून येतो.

२.५ <u>मजूर सहकारी संस्थांबाबत महाराष्ट्र शासनाचे धोरण व त्याचे बदलते स्वरूप :-</u>

महाराष्ट्र शासनाने १९४८ पासून मजूर सहकारी संस्थांना वेळोवेळी ब-याच सवलती दिल्या आहेत. त्या सर्व सवलतींचे दिनांक ३० मार्च १९७९ च्या शासन निर्णयान्वये एकत्रीकरण करण्यात आले. व त्यामध्ये ५ डिसेंबर १९८४ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे काम देणा-या खात्यांना मजूर सहकारी संस्थांना कोणत्या सवलती दिल्या हे पाहणे सोईस्कर झाले.

१३ जून १९७९ च्या शासन निर्णयान्वये मजूर सहकारी संस्थांच्या अडीअडचणी जिल्हा पातळीवर सोडविण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमलेली असून सदरच्या उपसमितीच्या सभा दर तीन महिन्यांनी घेण्यात याव्यात अशा सूचना दिल्या आहेत. सदरच्या उपसमितीचे सदस्यसचिव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था असून सर्व कामे देणारी खाती व जिल्हा मजूर संघाचे पदाधिकारी सदस्य आहेत. या उपसमितीच्या सभा हया दर तीन महिन्यांनी घेण्याचे शासनाचे आदेश आहेत. अशा सभा घेतल्यास मजूर सहकारी संस्थांच्या अडीअडचणी जिल्हा पातळीवरच सोडविण्यास मदत होईल.

काम वाटप जिल्हा फेडरेशनचे अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमार्फत १९७३ पासून ते दिनांक ३.७.१९७९ पर्यन्त अत्यंत व्यवस्थितपणे होत होते. परंतू एकाएकी

कोणत्याही फेडरेशनला न विचारता किंवा कोणत्याही फेडरेशनला कसल्याही प्रकारची ताकीद न देता ३.७.१९७९ च्या परिपत्रकाने अचानकपणे फेडरेशनचे काम वाटपाचे अधिकारे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे दिले. [यामुळे मजूर सहकारी संस्थांचे "सरकारी" करण करण्यात आले अशी टीका केली जाते]

महाराष्ट्र शासनाचे मजूर सहकारी संस्थांना देण्यात येणा-या सवलतीबाबतचे धोरण :-

सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्रमांक एलसीएस १०७७/५५९३३/का.२७, दिनांक ३० मार्च १९७९ अन्वये राज्यातील मजूर सहकारी संस्थांना बांधकामाविषयी काही सवलती शासनाने मंजूर केल्या. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक एलसीएस १०८३/८४७१४/७९८/मि.व्य-३ दिनांक ५ डिसेंबर १९८४ अन्वये काही सुधारणा करून मजूर सहकारी संस्थांना खालील सवलती देण्यात आल्या आहेत.

[१] कामे देणा-या सर्व खात्यांनी दोन लाख रूपये किंमतीची कामे अद्यावत दरसूची प्रमाणे सुधारून ती अंदाजपत्रक दराने, कामाची निविदा न मागविता, काम वाटप समितीमार्फत मजूर सहकारी संस्थांना द्यावीत.

[२] [अ] जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे अध्यक्षतेखाली शासनाने काम वाटप समिती निर्माण केलेली असून सदरच्या समितीसाठी सदस्य सचिव म्हणून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कचेरीतील उपअभियंता [मजूर सहकारी संस्था] यांची नियुक्ती केली आहे. सदरच्या काम वाटप समितीमध्ये सदस्य म्हणून जिल्हा मजूर सहकारी संघाचे प्रतिनिधी व कामे देणा-या खात्याचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. काम वाटप समितीच्या सभा सदर आठवडयाला ठरलेल्या दिवशी व वेळेला घेण्यात येतात.

[ब] कामे देणा-या खात्यांनी २ लाख रुपयापर्यन्तच्या सर्व कामांची यादी सुधारित अंदाजपत्रकी किंमतीसह शासनाच्या आदेशाप्रमाणे, काम वाटपासाठी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे पाठवावी व त्याची प्रत जिल्हा मजूर सहकारी संघाकडे माहितीसाठी पाठवावी. काम देणा-या खात्याकडून कामाची यादी मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत मजूर सहकारी संस्थांना काम वाटप समितीने कामाचे वाटप करुन जिल्हा संघामार्फत कामे देणा-या खात्यांना व संबधित मजूर संस्थांना कळविणे आवश्यक आहे.

[क] ज्या अत्यंत तातडीच्या कामासाठी जिल्हा संघ अगर जिल्हा उपनिबंधक, यांना कळविण्यास पुरेसा अवधी नसेल अशी कामे, कामे देणारी खाती कोणत्याही संस्थेस देऊ शकतील., परंतु असे करताना सदरची कामे विवक्षित ठेकेदारांना देण्याबाबतची कारणे लेखी नोंदवावीत व ती कारणे जिल्हा उपनिबंधक जिल्हा संघ यांना कळवावीत व त्याची प्रत संबंधित अधीक्षक अभियंता यांच्या मार्फत मुख्य अभियंता यांना कळविण्यात यावी.

[ड] जेंव्हा एखादे काम मजूर सहकारी संस्थांना काम वाटप समितीकडून दिले जाईल तेंव्हा त्या संबंधीच्या आदेशाच्या नकला जिल्हा मजूर संघाने जिल्हा उपनिबंधक यांनी काम देणा-या खात्यांना पाठवाव्यात. हया आदेशाच्या प्रती मिळताच काम देणा-या खात्यांनी संबंधीत मजूर संस्थेबरोबर त्वरित करार करुन ७ दिवसातकामाचा आदेश धावा व त्याची प्रत जिल्हा संघाला व जिल्हा उपनिबंधक यांना धावी,

[इ] जिल्हा उपनिबंधक अथवा जिल्हा संघ यांना कामे कळविताना कामे देणा-या खात्यांनी कामाची अंदाजे किंमत, काम पूर्ण करण्याची मुदत, कामाची जागा आणि काम करवून घेणारा उपविभाग हया संबंधीची माहिती कळविणे अत्यंत अवश्यक आहे.

[फ] ज्या वेळेस मजूर सहकारी संस्था बॅन्केकडे कर्ज मागणी करतात त्यावेळेस बॅन्क त्यांच्याकडे काम मिळाल्याचा दाखला मागतात. सदरचा दाखला कार्यकारी अभियंता यांनी कामाचे योग्य तपशिलासह विनाविलंब संस्थेस द्यावा.

[ग] मजूर सहकारी संस्थेचे कमीत कमी ५० % सभासद कामावर प्रत्यक्ष काम करणारे पाहिजेत.

[ह] जेंव्हा काम पूर्ण होईल तेंव्हा संबंधित मजूर सहकारी संस्थेला काम देणा-या खात्यांनी मुदतीत अंतिम बिल द्यावे. व काम पूर्ततेचा दाखला द्यावा. तसेच कार्यकारी अभियंता यांनी सर्व मजूर सहकारी संस्थांना शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात पासबुक द्यावे. व या पास बुकात संबंधित कामे देणा-या खात्यांनी कामाचा आदेश देताना त्या कामांची नोंद करावी.

[ज] संबधित काम देणा-या खात्यांनी मजूर सहकारी संस्थांना कामे पूर्ण केल्यानंतर कामाचे गोपनीय अहवाल त्वरित कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग, यांना पाठवावेत.

[३] वर्गीकरण :-

मजूर सहकारी संस्थांचे काम मिळण्याबाबतचे पात्रतेसंबंधीचे वर्गीकरण शासनाच्या सुधारित आदेशाप्रमाणे खालीलप्रमाणे आहे -

| | | |
|---|---|---|
| १. | जास्तीत जास्त रुपये ५०,०००/- | "क" वर्ग |
| २. | जास्तीत जास्त रुपये १,००,०००/- | "ब" वर्ग |
| ३. | जास्तीत जास्त रुपये २,००,०००/- | "अ" वर्ग |

मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरणाचे अधिकारी खालील प्रमाणे आहेत.

"अ" वर्ग – अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ.

"ब" वर्ग – आणि –"क" वर्ग – कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

मजूर सहकारी संस्थांच्या वर्गीकरणाचे नुतनीकरण दर तीन वर्षानी संबंधित अधिकाऱ्याकडून करून घेणे आवश्यक आहे, ते करतानासंस्थेची आर्थिक स्थिती, व्यवस्थापकीय व तांत्रिक क्षमता, सेवक वर्ग, संस्थेची काम करण्याची क्षमता इत्यादी गोष्टी विचारात घेतल्या जातात.

ज्यावेळेस २ व ३ लाख रूपये किंमतीच्या निविदा मागविण्यात येतात अशावेळी मजूर सहकारी संस्थांनी जर निविदा भरली असेल तर संस्थेची निविदा इतर कमीतकमी स्वीकारार्ह निविदापेक्षा ५% किंवा १०,०००/– रूपये रक्कमेच्या आत असेल तर तिला कमीत कमी निविदेपेक्षा प्राधान्य देण्यात यावे.

[४] इसारा [बयाणा] रक्कम

दोन लाख रूपयापर्यन्तची कामे निविदा न मागविता देण्याची असल्याने इसारा रक्कमेचा प्रश्न उद्भवत नाही. दोन लाख रूपये किंमतीपेक्षा जास्त रकमेची कामे किंवा ज्या कामाच्या रीतसर निविदा मागविण्यात आलेल्या असतील अशी कामे मजूर सहकारी संस्थांना देताना इतर ठेकेदाराप्रमाणे त्यांच्याकडून इसारा रक्कम घेण्यात यावी.

[५] सुरक्षा अनामत [तारण ठेव]

[अ] जेंव्हा मजूर सहकारी संस्थांना २ लाख रूपयापर्यन्तची कामे दिली जातात तेंव्हा शासनाकडून जर सिमेंट, लाकूड, लोखंड, पन्हाळीपत्रे इ.

माल देण्याचा अंतर्भाव नसेल तर सुरक्षा ठेव घेण्याची आवश्यकता नाही.

[ब] ज्यावेळी दोन लाख रुपये किंमतीच्या कामामध्ये शासनाकडून सिमेंट, लोखंड, पन्हाळी पत्रे इ. मालाचा पुरवठा करण्याचा अंतर्भाव असेल त्यावेळेस अशा कामाबाबत सर्वसाधारणपणे घेण्यात येणा-या तारण ठेवीच्या ५० % तारण ठेव घ्यावी. सुरुवातीस नाममात्र अंदाजी किंमतीच्या १ % अगर कमीत कमी रुपये १००/- घेण्यात यावेत व राहिलेली रक्कम चालू बिलामधून नियमितपणे वसूल करण्यात यावी.

[क] मजूर सहकारी संस्थांनी निविदा मागवलेल्या कामासाठी स्वतंत्र ठेकेदाराप्रमाणे निविदा भरलेली असेल तर तारण ठेव भरण्यासाठी मजूर सहकारी संस्था या इतर ठेकेदाराप्रमाणेच मानण्यात येतील.

[६] पतदारी दाखला :-

मजूर सहकारी संस्थांना पतदारी दाखला देण्यासंबंधी सूट देण्यात यावी. परंतू त्यासाठी जिल्हा उपनिबंधक, / जिल्हा मजूर सहकारी संघ यांचेकडून संस्थेच्या आर्थिक क्षमतेबद्दलचा दाखला घेण्यात यावा.

[७] अवजारे व मालाचा पुरवठा :-

मजूर सहकारी संस्थांना लागणारी अवजारे व माल कामे देणा-या खात्याने अग्रहक्काने पुरविला पाहिजे. परंतु अनेक मजूर सहकारी संस्था त्या विभागात एकाचवेळी काम करीत असतील तर पुष्कळ वर्षे चांगले काम करणा-या मजूर सहकारी संस्थेस याबाबत अग्रहक्क घ्यावा. मजूर सहकारी संस्थांना आर्थिक आडचणीस तोंड द्यावे लागू नये. म्हणून कामाच्या यांत्रिक दबाईचा भाग शक्यतो मजूर सहकारी संस्थांच्या कामामध्ये समावेश करु नये. कामाच्या योग्य व जलद प्रगतीसाठी जर कामाच्या घटकामध्ये दबाई घालणे आवश्यक असेल तर रोलरचे भाडयाचे दर निविदामध्ये

दाखविणे जरूर आहे. रोलरचे भाडयाचे दर वाढल्यास संस्थेने जुने दर ठेवून वाढीव खर्च परस्पर कामावर टाकावा.

[८] खाण उपलब्धता :-

कामे देणा-या खात्यांनी मजूर सहकारी संस्थेस खात्याच्या खाणी वापरण्यास अथवा नवीन खाणी सुरु करण्यास शिफारशी करून सर्व त-हेने मदत केली पाहिजे.

[९] कामाची फोड :-

दोन लाख रूपये किंमतीच्या वरील कामांची शक्यतो विभागणी करून ती मजूर सहकारी संस्थांना देणे शक्य असेल तर २ लाख रूपयावरील अशा कामाचा भाग मजूर सहकारी संस्थांना देता येईल.

[१०] प्रदान आणि आगाऊ प्रदान :-

[अ] सर्वसाधारणपणे त्या मजूर सहकारी संस्थांना प्रदाने शक्य तो लवकर करावयाची असतात. कामाची मोजमापे घेणे, तपासणे इ. मुळे प्रदान लवकर करणे शक्य नसेल तर बांधकामाच्या ७५ % किंमत उशीर होण्याची कारणे नोंदवून आगाऊ प्रदान म्हणून द्यावीत.

[ब] मजूर सहकारी संस्थांना कामाच्या किंमतीच्या २० % अथवा १०,००० रूपये या दोहोपैकी कमी असलेली रक्कम व्याज न घेता आगाऊ प्रदान म्हणून काम सुरु करण्याचा आदेश दिल्यावर देण्यात यावी. हे आगाऊ प्रदान निविदा न मागविता मजूर सहकारी संस्थेस दिलेल्या २ लाख रूपये किंमतीच्या कामासाठी देण्यात यावे.

[११] तंटयाच्या वेळी लवाद :-

जर कामे देणारी खाती व मजूर सहकारी संस्था यांचेमध्ये तंटा निर्माण झाला तर त्या विभागाचे अधीक्षक अभियंता यांचा निर्णय अंतीम असेल. हा निर्णय लवादाचा निर्णय म्हणून न राहता प्रशासकीय निर्णय म्हणून मानला जाईल.

दिनांक ३० मार्च १९७९ व ५ डिसेंबर १९८४ च्या शासन निर्णयान्वये वरील प्रमाणे मजूर सहकारी संस्थांना दिलेल्या सर्व सवलती रद्द करण्याचा आदेश शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक एलएबी १०८६/सी आर २९६/का-इमारती २, दिनांक २०.१०.१९८६ अन्वये देण्यात आला. तेंव्हा या आदेशास स्थगिती मिळावी म्हणून काही जिल्हा मजूर सहकारी संस्थेचे संघ व मजूर सहकारी संस्थांचा राज्य संघ यांनी मुंबई येथील उच्च न्यायालयात अर्ज दाखल केले. तेंव्हा अर्जाची सुनावणी होईपर्यन्त मध्यंतरीच्या काळात कार्यवाही करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक एल.सी.एस.१०८६/६२९१/७/३६८/९ सी, दि. २३ मार्च १९८७ अन्वये अंतरिम आदेश दिले. या अंतरिम आदेशान्वये दि. २२.१०.१९८६ च्या आदेशाच्या अंमलबजावणीस उच्च न्यायालयाने स्थगीती दिली नाही. तथापि असे निर्देशित केले की, ज्या मजूर सहकारी संस्था :-

१. मजूरीचे काम न करणा-या सर्व सभासदांना संस्थेमधून काढून टाकतील.
२. मजूर सभासदांना ओळखपत्रे देण्याचे मान्य करतील.
३. सभासदांची बँकेत खाती उघडून त्यांना धनादेशाद्वारे मजुरीची रक्कम देण्यास तयार होतील आणि
४. सभासदासाठी अपघाती विमा योजना सुरु करतील.

उच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या यावरील अटी पूर्ण करणा-या मजूर

सहकारी संस्था निश्चित करणे व त्यानंतर अशा संस्थांना दि. २२.१०.१९८६ पूर्वी असलेल्या सर्व सवलती देणे यासंबंधी खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले.

[अ] मजूर सहकारी संस्थांतील प्रत्यक्ष मजूरीचे काम न करणा-या सभासदाचे सदस्यत्व रद्द करणे -

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी या मुद्यावर खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. मजूर सहकारी संस्थांनी मजूरीचे काम न करणा-या सभासदाची यादी व अशा सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधकांकडे सादर केला पाहिजे.

२. वरीलप्रमाणे संस्थेकडून प्रस्ताव मिळाल्यावर संस्थांनी केलेल्या शेवटच्या ५ कामाचे मस्टर रोल अगर त्याबाबतच्या दिलेल्या मजुरीचे कागदपत्र तपासून घ्यावे आणि त्यानंतरच अशा सभासदांची नांवे निश्चित करावीत आणि त्यानुसार संस्थेच्या प्रस्तावास मान्यता द्यावी.

३. प्रत्यक्ष मजूरीचे काम न करणा-या सभासदांमध्ये संस्थेत नोंदलेले सभासद, अध्यक्ष किंवा संचालक मंडळातील सदस्यांचाही अंतर्भाव होईल.

४. वरील क्रमांक १ ते ३ नुसार काढून टाकलेल्या सभासदांचे जागी नवीन सभासद नोंदवावयाचे झाल्यास अशा व्यक्ती मजूर म्हणून काम करणा-या असल्याची खात्री करून नंतरच त्यांना सभासद करण्याच्या प्रस्तावास मान्यता द्यावी.

[ब] ओळखपत्रे देण्याबाबत कार्यवाही :-

१. मजूर सहकारी संस्थांच्या सभासदाकरिता संस्थांनी ओळखपत्रे छापून अगर चक्रमुद्रित करून घ्यावीत.

२. वरीलप्रमाणे ओळखपत्रे दिलेल्या सभासदांच्याच नावे बॅन्केत खाती उघडावीत.

३. सर्व सभासदांची खाती उघडली आहेत याची जिल्हा उपनिबंधकांनी बॅन्केत तपासणी करून खात्री करून घ्यावी व नंतर अशा संस्थांना खाती उघडल्या बाबतचे प्रमाणपत्र द्यावे.

४. संस्थेत मजुरांच्या नांवावर आठवडयाच्या मजुरीची रक्कम दाखविणारा तक्ता धनादेशासहित दर आठवडयात बॅन्केला देण्याकरिता, योग्य त्या सूचना द्याव्यात व त्यानुसार कार्यवाही केली जाते की नाही हे वेळोवेळी तपासून पहावे.

[ड] अपघाती विमा योजना :-

१. जिल्हा संघाच्या सल्ल्याने प्रत्येक संस्थेने सर्व मजूर सभासदांसाठी अपघाती विमा योजना सुरू करण्याबाबत योग्य त्या सूचना द्याव्यात व त्याप्रकारे संस्थेने कार्यवाही केली आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी.

२. सर्व सभासदांचा अंतर्भाव विमा योजनेत झाला आहे. याची खात्री करून त्यासंबंधीची नोंद सभासदाच्या ओळखपत्रात करावी.

वरीलप्रमाणे तपासणी पूर्ण झाल्यानंतर ज्या संस्थांनी उच्च न्यायालयाने ठरविलेल्या अटी पूर्ण केलेल्या आहेत. अशा संस्थांना काम वाटून देण्यासाठी खालील-प्रमाणे उपाय योजना करावी :-

काम वाटप समिती :-

प्रत्येक जिल्हयात मजूर सहकारी संस्थांना काम वाटून देण्यासाठी शासन परिपत्रक क्रं. एलएसीएस १०७९/३८१३३/९-सी, दिनांक ३ जुलै १९७९ च्या आदेशान्वये

काम वाटप समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीची पुनर्रचना करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. उपरोक्त ३ जुलै १९७९ चे आदेश रद्द करून खालीलप्रमाणे सदर समितीची पुनर्रचना करण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | अध्यक्ष |
| २. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | - | सदस्य |
| ३. | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग | - | सदस्य |
| ४. | जिल्हा मजूर सहकारी संस्थांच्या संघाचे प्रतिनिधी | - | सदस्य |
| ५. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | - | सदस्य |

जिल्हयातील काम देणा-या विभागांनी / खात्यांनी त्यांच्याकडे मजूर सहकारी संस्थांकडून करून घ्यावयाच्या सर्व कामांची यादी पूर्वीप्रमाणे जिल्हा उपनिबंधक व जिल्हा मजूर फेडरेशन यांना पाठवावी व त्यानंतर सदर समितीने उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशात ठरवून दिलेल्या अटी पूर्ण केलेल्या मजूर सहकारी संस्थांना कामाचे वाटप करावे. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांच्या केलेल्या तपासणी संबंधीचा अहवाल काम वाटप समितीच्या अध्यक्षाकडे सादर करावा व त्या अनुषंगाने उपलब्ध कामे विचारात घेऊन तसेच संबंधित संस्थांची क्षमता लक्षात घेऊन त्यांना सर्वसाधारणपणे समप्रमाणात कामाचे वाटप करावे.

२३ मार्च १९८७ च्या शासन निर्णयान्वये वरीलप्रमाणे जे अंतरिम आदेश काढले होते ते दिनांक ३ सप्टेंबर १९८७ च्या शासन निर्णयान्वये कायम करण्यात आले. हया आदेशांची अंमलबजावणी करताना शासकीय अधिका-यांना व मजूर सहकारी संस्थांना काही व्यवहारीक अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणले गेले शासनाने याबाबत सर्व संबंधितांशी विचार विनिमय करून दिनांक २३ मार्च १९८७ च्या शासन निर्णयामधील खालील बाबतीत सुधारणा करण्याचा निर्णय, शासन निर्णय

क्रमांक एल.सी.एस.१०८८/४०४४/सी.आर,१७१/९ सी दि. २३ सप्टेंबर १९८८ अन्वये घेतला :-

१. दि. २३ मार्च १९८७ च्या शासन निर्णयामधील अट क्रमांक ३ नुसार मजूर सहकारी संस्थांच्या सभासद मजूरांना धनादेशाने मजुरी देण्यात यावी असे आदेशित करण्यात आले आहे. या आदेशाच्या पूर्ततेतील व्यवहारिक अडचणींचा विचार करून शासनाने मजूरी वाटपासाठी पुढील सुधारित सुचना दिल्या आहेत -

१. मजुरी मस्टररोलवरील नोंदीप्रमाणे द्यावी.

२. मजुरांना काम दिल्यावर त्याची नोंद मस्टर रोलवर करावी.

३. मजूरांना अग्रीम दिले असल्यास त्याची वजावट मस्टररोलवर दाखवावी. अग्रीम २०० रूपयांच्या मर्यादेपर्यन्तच द्यावे.

४. मजुरीच्या रक्कमेचे वाटप झाल्यावर संस्थेच्या सचिवाने मस्टररोलवर सार्वजनिक बांधकाम खात्याच्या पध्दतीप्रमाणे प्रमाणपत्र नोंदवावे.

५. मजूरांना दिलेल्या अग्रीमाचे कायम स्वरूपी रजिस्टर ठेवावे.

२. दिनांक २३ मार्च १९८७ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या काम वाटप समितीत काही फेरबदल करण्यात आले, त्यानुसार या समितीच्या अध्यक्षपदी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे ऐवजी जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था यांना नेमण्यात आले असून जिल्हा उप-निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयातील उप-अभियंता [ मजूर सहकारी संस्था ] यांना सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ज्याठिकाणी उप-अभियंता नसेल तेथे सचिव म्हणून जिल्हा उप-निबंधक कार्यालयातील सहाय्यक निबंधकानी ते काम पहावयाचे आहे. काम वाटप समितीतील उर्वरित तीनही सदस्य कायम ठेवण्यात आले आहेत.

वरील प्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या मजूर सहकारी संस्थांना दिलेल्या सवलतींच्या धोरणात सतत बदल होत गेलेले आहेत.

## मजूरसहकारी संस्थांच्या नोंदणी बाबत धोरण :-

शासनाचा उद्देश फलदायी करण्याच्या दृष्टीकोनातून सहकारी खात्यातील विभागीय व जिल्हा पातळीवरील अधिका-यांबरोबर विचार विनिमय करून मजूर सहकारी संस्था नोंदणी बाबतच्या धोरणाची जी रूपरेषा ठरविली होती ती सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या १९ एप्रील १९८५ च्या परिपत्रकाच्या साहयाने प्रसिध्द करण्यात आली . त्यातील काही प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे :-

१. संस्थेमध्ये किमान ५० मजूर सभासद असावेत. प्रत्येक सभासदाने किमान एक भाग [ शेअर ] सुरूवातीला घेतला पाहिजे. त्यानंतर एक वर्षात त्याने प्रत्येकी ३ भागाइतकी रक्कम संस्थेकडे भरली पाहिजे. ही रक्कम त्याचे मजुरीतून हप्त्या हप्त्याने कापून संस्थेत जमा करावी.

२. संस्था नोंदणीकरिता तालुका हाच घटक [ युनिट ] मानण्यात यावा. तालुक्यातील अस्तित्वात असलेल्या संस्थांची संख्या व वर्षामध्ये तालुक्यात निघणारी कामे यांचा विचार व्हावा. अस्तित्वात असलेल्या संस्थांना प्रत्येकी ३ लाख ५० हजार रूपये किंमतीच्या मजुरीची कामे मिळेपर्यन्त दुसरी संस्था नोंदविण्यात घेऊ नये. नवीन कामाचा हिशेब लक्षयात घेऊन जर नवीन संस्थेस विहीत निकषाप्रमाणे कामे मिळण्याची शक्यता असेल तरच सदर तालुक्यात नवीन संस्था नोंदणी विषयी विभागीय समितीने अनुकूलता दर्शवावी.

३. सध्या तालुक्यात अस्तित्वात असलेल्या संस्थांना वरीलप्रमाणे कामे मिळण्याची शक्यता असून जर अधिक कामे निघत असतील तरच तालुक्यात नवीन संस्थांची नोंदणी व्हावी. तसेच तालुक्यातील एखादा विशिष्ट भागातच गरजेपेक्षा जास्त प्रमाणावर मजूर सहकारी संस्था असल्यास त्या विशिष्ट भागात नवीन संस्थांची नोंदणी न करता ज्या भागामध्ये अशा संस्था नाहीत किंवा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्याचे प्रमाण फार कमी आहे अशा भागातच नवीन संस्थांची नोंदणी करण्यात यावी.

४. संस्थेतील सभासदांचे राजीनामे, त्याच प्रमाणे संस्थेत नवीन सभासद करून घेणे यासाठी नोंदणी अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घ्यावी.

५. मजूर सहकारी संस्थांच्या सभासदांना प्रचलित दराप्रमाणे रोज १५ ते २० रुपये मजुरी मिळावयास पाहिजे. तसेच वर्षातील २०० ते २४० दिवस तरी या संस्थांना आपल्या सभासदांना काम देता आले पाहिजे. वरील बाबींचा विचार करता संस्थेस किमान ३ लाख ५० हजार रुपये मजुरी मिळेल अशी कामे करावी लागतील इतक्या किंमतीची कामे जितक्या संस्थांना मिळू शकतील तितक्याच संस्थांची नोंदणी करण्यास परवानगी द्यावी.

अशा प्रकारच्या मार्गदर्शक सूचना लक्षात घेऊन मजूर सहकारी संस्थांचे नोंदणी करिता काही विशिष्ट तत्वे ठरवून त्यानुसार नोंदणी प्रकरणांची छाननी करण्याकरिता व पूर्व परवानगी देण्याकरिता विभागीय पातळीवर एक समिती असेल. विभागीय सहनिबंधक यांचे अध्यक्षतेखालील या समितीत ज्या जिल्हयातील ते प्रकरण असेल त्या जिल्हयाचे उपनिबंधक, संबधित जिल्हयाचे उपअभियंता [ मजूर सहकारी संस्था ] तसेच संबंधित जिल्हयाच्या मजूर संस्थांच्या फेडरेशनचा प्रतिनिधी यांचा समावेश असेल. या समितीने मार्गदर्शक सूचना व नोंदणी संबंधीचे नियम यानुसार त्या प्रकरणाची छाननी करून मान्यता दिल्यानंतरच खऱ्याखुऱ्या मजूरांची संस्था संबंधित अधिकाऱ्याकडून नोंदली जाईल.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

# -: संदर्भ :-

[१] व्ही. टी. चौगुले, के. जी. पठाण, " सहकाराची मुलतत्वे " भाग १ मजूर सहकारी संस्था, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान क्र. १५५.

[२] डॉ. जे. एफ. पाटील, एस. के. खोबरे, "लेबर को-ऑपरेटिव्हज पोजिशन, प्रॉब्लेम्स ॲन्ड पोटेन्शल" - इंडियन को. ऑपरेटिव्ह रिव्ह्यू, एप्रील १९८५, पान क्र. ४०५.

[३] प्रा. पी. जे. ताम्हणकर - " स्वयंसेवी संघटना व ग्रामीण विकास - मजूर सहकारी संस्था एक मार्ग. पान क्र. ३. (शोध निबंध)

[४] "रिपोर्ट ऑफ दी कमिटी ऑन को-ऑपरेटिव्ह प्लॅनिंग १९६४". पान क्र. ९४.

[५] प्रा. पी. जे. ताम्हणकर - उपरोक्त, पान क्रमांक ४.

[६] डॉ. जे. एफ. पाटील, एस. के. खोबरे - उपरोक्त पान. क्रमांक ४०४.

[७] राजाभाऊ कुसाळकर, " महाराष्ट्रातील मजूर सहकारी चळवळ " सहकारी महाराष्ट्र, नोव्हेंबर १९८५, वर्ष २४ वे, अंक १ ला, प्रकाशक महाराष्ट्र राज्य सहकारी मर्यादित, पुणे. पान क्र. १३.

[८] संपादकीय - "मजूर सहकारी संस्थांचा प्रश्न" सहकारी विश्व, जुलै ऑगस्ट १९८५, अंक ७-८. प्रकाशक महाराष्ट्र राज्य सहकारी मर्यादित पुणे. पान क्र. २

[ ९] संपादकीय, "श्रमाचा योग्य मोबदला मजूरांना मिळाला पाहिजे "
सहकारी महाराष्ट्र, जूलै १९८५, वर्ष २३ वे, अंक ९वा, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे, पान क्रं. २.

[१०] बी. एस्. माथूर - "को-ऑपरेशन इंन इंडिया" १९८८, साहित्य भवन, आग्रा. पान क्रमांक ४१७.

[११] डॉ. जे. एफ. पाटील, एस्. के खोबरे, उपरोक्त, पान क्र. ४०५
आणि
व्ही. टी. चौगुले, के. जी. पठाप, उपरोक्त, पान क्रमांक १५५.

[१२] महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०-, मजूर सहकारी संस्थांचा उप-विधी ,- पान क्रमांक १-२.

[१३] को-ऑपरेशन इन इंडिया, मिनिस्टरी ऑफ कम्युनिटी डेव्हलपमेंट ॲन्ड को-ऑपरेशन इन इंडिया, पान क्रमांक १७०.

[१४] बी. एस्. माथूर - उपरोक्त, पान क्रमांक ४१७.

[१५] राजाभाऊ कुसाळकर - "महाराष्ट्र राज्यातील मजूर सहकारी चळवळ" सहकारी महाराष्ट्र, नोव्हेंबर १९८४, पान क्रमांक ९७-९८ आणि
डॉ. जे. एफ. पाटील, एस्. के. खोबरे उपरोक्त, पान क्रमांक ४०६.

[१६] वि. शं. नाखे - " मजूर सहकारी संस्था - आत्म परिक्षणाची गरज "
सहकारी महाराष्ट्र, सप्टेंबर १९८४. पान क्रमांक १५.

[१७] महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक एलसीएस् १०७०/५५९३३/का - २७, दिनांक ३० मार्च १९७९, पान क्रमांक ३२-३३.

मजूर सहकारी संस्थांबाबत महाराष्ट्र शासनाचे
धोरण व त्याचे बदलते स्वरूप यासाठी खालील
संदर्भाचा वापर केलेला आहे.

-: आ धा र :-

[१] महाराष्ट्र शासन - सार्वजनिक बांधकाम विभाग आणि गृह निर्माण विभाग.
शासन निर्णय क्रमांक एलसीएस् १०७७/५५९३३/का-२७
दिनांक ३० मार्च १९७९.

[२] महाराष्ट्र शासन कृषी व सहकार विभाग
शासन निर्णय क्रमांक एलसीएस् १०७६/२८०४/३२५/ ९ सी
दिनांक १३ जून १९७९.

[३] महाराष्ट्र शासन कृषी व सहकार विभाग
शासन निर्णय क्रमांक आयसीएस् १०७९/३६१३३/९सी
दिनांक ३ जुलै १९७९.

[४] कृषि व सहकार विभाग
शासन निर्णय क्रमांक आयसीएस् १०८२/३५८७२/६५६/९सी
दिनांक १३ सप्टेंबर १९८४.

[५] सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक एलसीएस् १०८३/८४७१४/७९८/मिव्य ३
दिनांक ५ डिसेंबर १९८४

[६] जा.क्र. अर्थ १/४ स.सं./नोंदणी १-८५
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक १९ एप्रील १९८५.
परिपत्रक विषय - मजूर सहकारी संस्था नोंदणी

[७] जा. क्र. एलसीएस/सवलती/परिपत्रक/डी-१/
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे.
दिनांक १३ फेब्रुवारी १९८६.

[८] महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक एलऐबी १०८६/सीआर २९६/का-इमारती-२
दिनांक २२ ऑक्टोबर १९८६.

[९] महाराष्ट्र शासन कृषि व सहकार विभाग
शासन निर्णय क्रमांक एलएसीएस् १०८६/६२९१/७/३६८/९-सी
दिनांक २३ मार्च १९८७.

[१०] महाराष्ट्र शासन कृषि व सहकार विभाग
शासन निर्णय क्रमांक एलसीएस् १०८८/४०४४/सीआर १७१/९सी
दिनांक २३ सप्टेंबर १९८८.